# प्रकरण २

# महाराष्ट्रातील ब्रिटिश सत्तेचे प्रारंभीचे स्वरूप

मागील प्रकरणात आपण १९ व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळातील महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक, आर्थिक जीवनाचे स्वरूप समजावून घेतले आहे. त्याचबरोबर ब्रिटिशांनी या प्रदेशात आपली सत्ता कशी प्रस्थापित केली याचीही माहिती घेतली आहे. महाराष्ट्र हा भारताचाच एक भाग आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील ब्रिटिश सत्तेच्या प्रारंभीचे राजकीय स्वरूप हे देशपातळीवरून पाहणे गरजेचे ठरणार आहे.

भारतात आणि महाराष्ट्रात ब्रिटिशांची सत्ता १५० वर्षे होती. १९ व्या शतकात भारतात झालेल्या प्रबोधनामुळे आणि इंग्रजांच्या शोषिक धोरणामुळे स्वातंत्र्य चळवळीचे वारे भारतात वाहू लागले. ब्रिटिशांच्या अन्यायी साम्राज्यवादी वृत्तीचे आकलन भारतीयांना होऊ लागले. यातून जो असंतोष घडून आला त्याचे प्रतिबिंब १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात दिसून आले. ईस्ट इंडिया कंपनीच्या साम्राज्यवादी धोरणाचा तो परिपाक होता. परिणामी, ब्रिटिश पार्लमेंटने भारतातील कंपनी सरकारच्या सत्तेचा शेवट केला. भारतात ब्रिटिश राजसत्तेची सत्ता पुढील काळात सुरू झाली. १९ व्या शतकाच्या प्रारंभी भारतातील ईस्ट इंडिया कंपनीने साम्राज्यवादी धोरण स्वीकारले होते. साम्राज्यविस्तार करत असतानाच त्यांनी आपली सत्ता स्थिर कशी राहील याकडेही विशेष लक्ष दिले होते. यासाठी त्यांनी नानाविध योजना राबविल्या. लोकांच्यातील ऐक्याची भावना वाढीस लावण्याचे प्रयत्न केले. वेगवेगळ्या सुधारणा राबविल्या. साम्राज्यविस्तार करीत असताना वेगवेगळी धोरणे व वेगवेगळे मार्ग अवलंबिले. ब्रिटिशांच्या सुदैवाने भारतीय सत्ताधीशांमधील परस्पर संघर्ष, एकतेचा अभाव, घरभेदीपणाची वृत्ती, राजकीय अकार्यक्षमता आणि सामाजिक शांतता या बाबी साम्राज्य-विस्तारास अनुकूल ठरल्या. त्यामुळे त्यांना भारतात आपली सत्ता वाढविणे शक्य झाले. या वाढलेल्या साम्राज्याला स्थैर्य प्राप्त व्हावे म्हणून कंपनी सरकारने पुढील काळात वेगवेगळ्या योजना राबविल्या. या योजना राबविताना भारतीयांचा विरोध होणार नाही याची दक्षता धूर्त व मुत्सद्दी इंग्रजांनी घेतली होती. भारतात व महाराष्ट्रात शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्याच्या कामाला प्राधान्य दिले. भारतातील परिस्थितीचा विचार करून ब्रिटिशांनी या क्षेत्रात हस्तक्षेप करण्याचे टाळले. त्यांनी आपले लक्ष या विभागातील मागासलेल्या समाजाच्या विकासासाठी व प्रगतीसाठी आपली सत्ता आहे असे भासविण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिशांनी मिळविलेले यश, त्यांची कार्यक्षमता आणि त्यांच्या प्रगत जीवनामुळे भारतीयांना ब्रिटिश सत्ता आपलीशी वाटू लागली. अज्ञान व अंधकारात चाचपडणाऱ्या समाजाला आपण पारतंत्र्यात अडकले जात

Scanned with ACE Scanner

आहोत याची जाणीवही झाली नाही. समाजाने ब्रिटिश सत्तेला विरोध केला नाही. त्यामुळे ब्रिटिशांना आपली सत्ता स्थिर करण्यास फारशा अडचणी जाणवल्या नाहीत.

पूर्वेकडील देशांशी व्यापार करून फायदा मिळविणे हे इंग्रजांच्या साम्राज्यवादाचे प्रमुख अंग होते. त्या अनुषंगाने इंग्लंडमध्ये काही व्यापाऱ्यांनी पूर्वेकडे व्यापार करणारी 'ईस्ट इंडिया कंपनी'ची स्थापना इ. स. १६०० मध्ये केली. या कंपनीचे भारतात आगमन झाले. त्यांनी मुंबई, मद्रास, कलकत्ता या प्रमुख बंदरांत व्यापारासाठी वखारी स्थापन केल्या. या वखारींच्या संरक्षणासाठी आपले सैन्य उभे केले. महाराष्ट्रात इंग्रजांनी प्रथम दाभोळ व राजापूर येथे वखारी सुरू केल्या. भारतातील राजकीय अस्थिरतेचा फायदा उठवून त्यांनी आपल्या राजकीय अस्तित्वाची जाणीव करून देण्यास सुरुवात केली. महाराष्ट्रातील मुंबई हे अत्यंत सुरक्षित बंदर होते. तेथे पोर्तुगिजांची सत्ता होती. १६६१ साली इंग्लंडचा राजा दुसरा चार्लस् व पोर्तुगीज राजकन्या यांच्या विवाहप्रसंगाच्या वेळी पोर्तुगालच्या राजाने इंग्लंडच्या राजाला मुंबई बेट आंदण म्हणून दिले. इ. स. १६६८ मध्ये दुसरा चार्लस् याने ईस्ट इंडिया कंपनीला १० पौंड वार्षिक भाडेपट्ट्यावर हे बेट दिले. मुंबई बंदराचे महत्त्व ओळखून ब्रिटिशांनी त्याच्या भोवतालचा प्रदेश जिंकून घेतला. या व्यापारी केंद्राचे महत्त्व वाढविले. थोड्याच कालावधीत मुंबई हे ब्रिटिशांचे भारतातील एक मुख्य व्यापारी केंद्र बनले.

भारतीय राजकारणातील अनागोंदीचा फायदा उठवत इंग्रजांनी भारतात १८ व्या शतकात आपले भारतातील आसन स्थिर केले. कंपनी सरकारच्या गव्हर्नर जनरलने वेगवेगळ्या वेळी वेगवेगळे डावपेचात्मक धोरणे आखून भारतातील वेगवेगळे भाग आपल्या वर्चस्वाखाली आणण्याचे यशस्वी प्रयत्न केले. महाराष्ट्रातील पेशव्यांच्या अखेरच्या पर्वात जो गोंधळ माजला त्याचा फायदा इंग्रजांनी करून घेतला. यशवंतराव होळकरांच्या पुण्यावरील आक्रमणाला घाबरून बाजीराव दुसरा याने इंग्रजांशी तह करून तैनाती फौज स्वीकारली. त्याच्या आधारेच इंग्रजांनी १८१८ ला पेशव्यांची सत्ता नष्ट केली. मात्र आपल्याविरुद्ध संपूर्ण महाराष्ट्रात असंतोष निर्माण होऊ नये म्हणून इंग्रजांनी मराठ्यांच्या साताऱ्याच्या गादीवर प्रतापसिंह महाराजांची स्थापना केली. त्याचा फायदा त्यांनी आपल्या राजकीय स्थैर्यासाठी करून घेतला. पुढे विस्तारवादी धोरणाचा अंगीकार करताना त्यांनी दत्तक वारस नामंजूर हे धोरण अवलंबिले. दरम्यान १८४८ मध्ये साताऱ्याचे छत्रपती शहाजी यांचा मृत्यू झाला. त्यांना संतान नव्हते. लॉर्ड डलहौसीने दत्तक वारस नामंजूर या धोरणाचा अवलंब करून साताऱ्याचे राज्य खालसा केले. महाराष्ट्रात काही ठिकाणच्या संस्थानिकांचा प्रदेश सोडून ब्रिटिशांचा अंमल प्रस्थापित झाला. संस्थाने ब्रिटिशांची अंकित झाली. त्यांची सत्ता नाममात्र राहिली. खरे सत्ताधीश इंग्रजच झाले.

इंग्रजांनी सत्ता मिळविल्यानंतर मुंबई इलाखा जाहीर केला. त्यानुसार पश्चिम महाराष्ट्र, गुजरातमधील बराच प्रदेश, संपूर्ण सिंध आणि कर्नाटकातील चार जिल्हे यांचा समावेश मुंबई इलाख्यात होत होता. मात्र विदर्भ आणि मराठवाडा यांचा समावेश नव्हता. इंग्रजांनी राजकीय स्थैर्य आणि व्यापाराची वाढ करण्यासाठी आपल्या वर्चस्वाखालील महाराष्ट्र व भारतात

Scanned with ACE Scanner

वेगवेगळी धोरणे राबविली. शिस्तबद्ध व कार्यक्षम प्रशासन यंत्रणा उभी केली. प्रशासन गतिमान होण्यासाठी दळणवळणाच्या सुविधा निर्माण केल्या. कायदा व न्यायदानाच्या बाबतीत सुसूत्रता आणली. भारतातून कमी पगारावर नोकर मिळावेत आणि इंग्रजांचे गुणगान करणारा वर्ग निर्माण व्हावा म्हणून शिक्षणाच्या क्षेत्रात प्रगती केली. तसेच मुद्रणकलेच्या व वृत्तपत्राच्या क्षेत्रातही प्रगती घडवून आणली. राजकीय स्थिरता आणि व्यापाराचा विकास हा हेतू समोर ठेवून या सुधारणा केल्या असल्या तरी भारतीयांच्या दृष्टीनेही या सुधारणांचा चांगला उपयोग झाला. नवीन विचार भारतात दाखल झाले. भारतात प्रबोधनाची सुरुवात झाली. प्रगत विचाराने प्रभावित झालेल्या समाजसुधारकांनी नवजागृतीस प्रारंभ केला. त्यामुळेच इंग्रजांनी घडवून आणलेल्या सुधारणांचे स्वरूप पाहणे आवश्यक ठरते. भारतीय सुधारकांना समाज परिवर्तन घडवून आणण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण केले.

महाराष्ट्रातील जनता पेशवाईतील संदोपसंदास कंटाळली होती. जनतेला त्याची उबग आली होती. अशा वेळीच इंग्रजांची सत्ता महाराष्ट्रात निर्माण झाली. या बदलाने महाराष्ट्रात आमूलाग्र बदल झाले. महाराष्ट्रातील धर्म, रूढी, परंपरा प्रिय असणाऱ्या समाजात सुधारणा करण्याचे प्रारंभी ब्रिटिशांनी टाळले. मात्र राज्याच्या स्थैर्यासाठी त्यांना काही सुधारणा राबवाव्याच लागल्या. राज्यकारभारासाठी लागणाऱ्या कारकुनांसाठी शिक्षणाची सुरुवात इंग्रजांनी केली. त्यांचा हेतू स्वार्थी होता. असे असले तरी शिक्षणामुळे नवीन विचार येथे आले. त्यामुळे जनतेचे परिवर्तन घडून आले. या कामी राजा राममोहन रॉय यांचे कार्य उल्लेखनीय आहे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन महाराष्ट्रातील अनेक सुधारकांनी महाराष्ट्रात नवजागृतीचे कार्य हाती घेतले.. त्यातून जनतेत आपल्या हक्कांची जाणीव झाली. ही जाणीव निर्माण करणारी वेगवेगळी क्षेत्रे येथे समजावून घ्यावयाची आहेत.

## ब्रिटिशांचे प्रशासन

ब्रिटिश राजवटीने राज्याच्या प्रशासनात केलेले बदल परिणामकारक होते. कोणत्याही शासनसंस्थेला आपल्या स्थिर शासनासाठी कार्यक्षम प्रशासन यंत्रणेची गरज असते. ब्रिटिश राज्यकर्ते हे परदेशातून आले होते. त्यांची सत्ता परकीयांची होती. या परकीय सत्तेविषयी लोकांना विश्वास वाटावा, त्यांच्यात असंतोष निर्माण होऊ नये यासाठी समाजात शांतता व सुव्यवस्था टिकविणे गरजेचे होते. आपली सत्ता टिकविणे व जनतेत शासनाविषयी प्रेम निर्माण करणे आवश्यक होते. त्यामुळेच ब्रिटिशांनी आपली शासनव्यवस्था चोख ठेवण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रातील राजकीय अस्थैर्य, गोंधळाची अवस्था, राज्यकर्त्याविषयी जनतेच्या मनात असलेली नाराजी इत्यादीतून ब्रिटिशांना मार्ग काढावयाचा होता. काळाची ही गरज जाणूनच ब्रिटिशांनी कार्यक्षम प्रशासन यंत्रणेला प्राधान्य दिले. इंग्रजांनी खुल्या व्यापाराचे तत्त्व स्वीकारले होते त्याचा परिणाम येथील व्यापार व लघु उद्योगावर झाला होता. परकीय माल मोठ्या प्रमाणात आयात केल्यामुळे एतद्देशीय धंदे देशोधडीला जाऊन बेकारी वाढलेली होती. देशात असंतोष माजत होता. अशा अवस्थेत लोकांचा विश्वास संपादन करण्यासाठी ब्रिटिशांना चांगल्या राज्यकारभाराची हमी देणे गरजेचे होते. या अनुषंगानेच माऊंट स्टुअर्ड एल्फिन्स्टन

Scanned with ACE Scanner

46313 Date 9 SEP 2011 KOLHAPUR

याने सन १८१८ मध्ये 'सातान्याची घोषणा' केली. त्या अनुषंगाने कायदा, सुव्यवस्था, शांतता व न्याय प्रस्थापित करण्याचे घोषित केले व प्रशासन कार्यक्षम करण्यावर भर दिला.

**एकसंघ सत्ता** : इंग्लंडमध्ये ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना पूर्वेकडे व्यापार करण्यासाठी झाली होती. त्यांनी भारतात व्यापारासाठी प्रवेश केला. येथील राजकीय गोंधळाच्या परिस्थितीचा फायदा घेऊन त्यांनी येथे साम्राज्य निर्माण केले. हे कार्य त्यांनी अत्यंत कौशल्याने पार पाडले. ज्या वेळी त्यांच्या व्यापारी धोरणात जनतेची अडसर येऊ लागली त्या वेळी त्यांनी संधी साधून इ. स. १७५७ मध्ये बंगालचा सुभेदार सिराजउद्दौलाशी लढाई केली. त्याला प्लासीचे युद्ध म्हणतात. त्या विजयानंतर ब्रिटिशांनी बंगालचा प्रदेश आपल्या नियंत्रणाखाली आणला. पुढे अल्पकालावधीतच ब्रिटिशांनी भारतातील बरेच प्रांत वर्चस्वाखाली आणले. ब्रिटिश सत्तेच्या विस्तारात मराठ्यांची अडसर येऊ लागली. शेवटी १८१८ मध्ये मराठ्यांचे राज्य त्यांनी नष्ट केले. त्यानंतर खऱ्या अर्थाने ब्रिटिशांचे एकसंघ राज्य निर्माण झाले. भारतातील साम्राज्यवाढीच्या कार्यात रॉबर्ट क्लाईव्ह, लॉरेन हेस्टिंग्ज, लॉर्ड वेलस्ली, लॉर्ड डलहौसी इत्यादी गव्हर्नर जनरलांचे योगदान मोठे आहे. वेलस्लीने तैनाती फौजेच्या योजनेत अनेक भारतीय सत्ताधीशांना अडकवून अंकित केले. डलहौसीने दत्तक वारस नामंजूर, काही लष्करी कारवाईद्वारे व काही अति महत्त्वाची राज्ये म्हणून ब्रिटिशांच्या साम्राज्याची वाढ केली. व्यापारी उद्देशाने स्थापन झालेल्या कंपनीने भारतात एकसंघ सत्ता स्थापन केली.

इंग्लंडच्या पार्लमेंटने प्रारंभापासून कंपनीच्या राज्यकारभारावर नियंत्रण ठेवले होते. या अनुषंगाने १७७३ साली रेग्युलेटिंग ॲक्ट व १७८४ साली पिटचा भारतविषयक कायदा मंजूर करून कंपनीच्या कारभारावर अनेक नियंत्रणे घातली. पुढे १८१३ च्या सनद कायद्याने कंपनीची भारतातील व्यापारविषयक मक्तेदारी संपुष्टात आणली. नंतर १८३३ च्या सनद कायद्याने ईस्ट इंडिया कंपनीची व्यापारविषयक कामे संपविली. कंपनीला प्रशासकीय बाबीवर लक्ष केंद्रित करण्यास भाग पाडले. या सनदेने गव्हर्नर जनरल व त्याचे संचालक मंडळ यांना भारतातील सर्व प्रदेशांवर नियंत्रण ठेवण्याचा आणि त्या प्रदेशांच्या प्रशासनासाठी आवश्यक ते कायदे करण्याचा अधिकार दिला. त्यामुळे कंपनीला भारतात एकसंघ सत्ता निर्माण करणे सुलभ झाले. तसेच प्रशासनात एकवाक्यता व सुसूत्रता निर्माण करणे शक्य झाले. हा भारतीय प्रशासनातील महत्त्वाचा टप्पा होता.

भारतातील एकसंघ सत्ता ही येथील लोकांसाठी अभूतपूर्व आणि दूरगामी परिणाम करणारी होती. भारतातील या पूर्वीचा कारभार एका सत्तेखाली आलेला नव्हता. मात्र, इंग्रजांनी भारतात एकसंघ सत्ता निर्माण केली. त्यामुळे येथील प्रशासनात एकसूत्रता निर्माण झाली. हा राजकीय क्षेत्रातील बदलाचा समाजसुधारणेसाठी उपयोग झाला. भारतात कंपनीच्या राजवटीविरुद्ध असंतोष वाढत राहिला. त्याची परिणती १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात झाली. इंग्लंडच्या पार्लमेंटने कंपनीच्या भारतातील कारभाराविषयी शंका निर्माण केली. कंपनीची भारतातील सत्ता सुरक्षित नाही याची जाणीव त्यांना झाली. परिणामी, १८५८ मध्ये ब्रिटिश पार्लमेंटने कंपनी सरकारकडून भारताचा राज्यकारभार काढून घेतला. या कायद्याने बोर्ड ऑफ

डायरेक्टर व कंपनी यांच्यातील संघर्ष संपला. भारतावर ब्रिटिश पार्लमेंटची प्रत्यक्ष सत्ता सुरू झाली. इंग्लंडमधील प्रशासकीय यंत्रणेच्या आधारावर भारतातील प्रशासनाची उभारणी करण्यात आली. प्रशासनात सूत्रबद्धता आणली. या वेळी इंग्लंडच्या व्हिक्टोरिया राणीने एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यानुसार भारतातील प्रशासन कार्यक्षम व निष्पक्षपातीपणे चालविण्याचे व भारतीयांना प्रशासनात योग्य ते स्थान देण्याचे आश्वासन देण्यात आले. देशात प्रशासकीय सुधारणेचे युग सुरू झाले.

जोपर्यंत भारताचा राज्यकारभार ईस्ट इंडिया कंपनीकडे होता तोपर्यंत त्या कारभारावर इंग्लंडच्या पार्लमेंटचे बारकाईने लक्ष होते. मात्र, १८५८ च्या कायद्यानंतर भारतातील सर्व प्रशासकीय अधिकारी भारतमंत्र्याच्या अखत्यारीखाली आला. परिणामी, भारतमंत्र्याची मर्जी संपादन करण्याकडे या वरिष्ठ वर्गाचे लक्ष केंद्रित झाले. भारतमंत्र्याला भारतातील कारभारावर इंग्लंडमधून लक्ष ठेवणे अशक्यच होत होते. परिणामी, तो प्रशासकीय वर्गावर विसंबून राहू लागल्याने अधिकारी वर्गाच्या हाती सत्तेचे केंद्रीकरण झाले. त्यामुळे नोकरशाही सामर्थ्यवान बनली. ते बेजबाबदार झाले. परिणामी, प्रजा व राज्यकर्ते यांच्यात दुरावा वाढत गेला.

ईस्ट इंडिया कंपनीने आपल्या सामर्थ्यावर संपूर्ण भारतावर आपली एकसंघ सत्ता निर्माण केली. राज्यकारभाराच्या सोईसाठी भारतीय प्रदेशाचे प्रांतात विभाजन केले. त्यावर स्वतंत्र अधिकाऱ्यांची नेमणूक केली. प्रांतात शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे आणि करवसुली करणे इत्यादी कामे या अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आली. मुख्य अधिकाऱ्याच्या मदतीला दुय्यम अधिकारी दिले व अधिकारपदाची एक परंपरा निर्माण केली. वेगवेगळ्या अधिकाऱ्यांची साखळी निर्माण केली. प्रशासनाला शास्त्रीय स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. अधिकाऱ्यांची कामे व अधिकार ठरवून दिले. ब्रिटिशपूर्व काळातील व्यक्तिनिष्ठा व विभूतिपूजा बंद होऊन समाजात या प्रशासनाद्वारे प्रादेशिक निष्ठा निर्माण होणे शक्य झाले. कंपनीच्या काळात भारतातील या प्रशासन यंत्रणेची कार्यक्षम चौकट निर्माण करण्याचे श्रेय कॉर्नवॉलिस या कार्यक्षम अधिकाऱ्याला दिले जाते. महाराष्ट्रातील जनतेला १८१८ नंतर या कार्यक्षम प्रशासन यंत्रणेची जाणीव होऊ लागली.

## १. महाराष्ट्रातील प्रशासन

आपणास येथे मुंबई इलाख्याच्या प्रशासनाचा विचार करावयाचा आहे. मुंबई इलाखा भारतीय प्रशासनाशी जोडला असल्यामुळे देशाच्या प्रशासनात ब्रिटिश काळात एकसूत्रता आणली. त्याचा विचार करावयाचा होता. सन १८१८ मध्ये पेशव्यांच्या सत्तेचा शेवट झाल्यामुळे मुंबई इलाख्यात पश्चिम महाराष्ट्राचा बराचसा भाग समाविष्ट झाला. मुंबई शहर व पश्चिम किनारपट्टीवरील प्रदेशावर कंपनी सरकारने आपले वर्चस्व प्रस्थापित केलेले होते. त्यात पेशव्यांच्या ताब्यातील राज्याचा समावेश झाला. १८४३ मध्ये कंपनी सरकारने सिंध घेऊन तो मुंबई इलाख्यास जोडला. १८४७ मध्ये कुलाबा संस्थान तर १८४८ मध्ये साताऱ्याचे राज्य मुंबई इलाख्यात समाविष्ट झाले. याशिवाय गुजराती भाषिक प्रदेश आणि कर्नाटकातील काही जिल्हे मुंबई इलाख्यात होते. त्यामुळे मुंबई इलाख्याचा प्रादेशिक पसारा मोठा होता.

Scanned with ACE Scanner

मुंबई इलाख्याचा गव्हर्नर म्हणून १८१९ ते १८२७ या काळात माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन याने काम पाहिले. तो अत्यंत कार्यक्षम अधिकारी होता. तो विद्या व कलेचा प्रेमी होता. तसेच तो उदारमतवादी होता. त्याने येथे प्रशासन भक्कम करत असताना जनतेला दुखवायचे नाही हे धोरण अंगीकारले. परिणामी, परकीय सत्ता लोकांना फारशी खुपली नाही. त्याने लोकांचा विश्वास संपादण्याकडे विशेष लक्ष दिले. पेशवाईच्या अखेरच्या काळात समाजात अशांतता व अव्यवस्था निर्माण झाली होती. दरोडेखोर, पेंढारी लूट करून जनतेला हैराण करीत होते. सततच्या दंग्यांनी प्रजा त्रस्त झाली होती. प्रजेच्या रक्षणाची जबाबदारी राज्यकर्ते करीत नव्हते. सर्वच प्रकारची अनागोंदी पसरलेली होती. एल्फिन्स्टनने मुंबई इलाख्याच्या प्रशासनाची भक्कम चौकट निर्माण करण्याला प्राधान्य दिले. मुलकी व अंतर्गत शांततेसाठी कार्यक्षम यंत्रणा उभी केली. चोर, लुटारू, दरोडेखोर यांचा बंदोबस्त केला. पोलीस दलाची उभारणी केली. प्रजेला शांतता व सुव्यवस्थेची जाणीव करून दिली. लोकांना आपल्या जीवित व वित्ताची हमी मिळाली. त्यामुळेच सर्वसामान्य लोकांनी ब्रिटिश राजवटीचे स्वागत केले. एल्फिन्स्टनने पेशवाईच्या पाडावाच्या वेळी 'साताऱ्याची घोषणा' केली. त्या अनुषंगाने ब्रिटिशांचे राज्य-कारभाराचे धोरण कसे राहील हे स्पष्ट करण्यात आले. न्याय व सुव्यवस्था निर्माण करण्याचे आश्वासन दिले. लोकांच्या धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनात ढवळाढवळ केली जाणार नाही असे स्पष्ट केले. जे वतनदार इंग्रजांशी एकनिष्ठ राहतील त्यांची वतने सुरक्षित राहतील. कोणावरही जुलूम-जबरदस्ती केली जाणार नाही. या आश्वासनांची त्याने अंमलबजावणी करण्याचे कसोशीने प्रयत्न केले. कार्यक्षम प्रशासन यंत्रणेच्या द्वारेच त्याला हे यश मिळविणे शक्य झाले.

**मुलकी प्रशासन** : पेशवाईच्या अखेरच्या पर्वात मुलकी प्रशासन हे जवळजवळ नष्ट झाले होते. सरकारी अधिकाऱ्यांच्या लहरीनुसार राज्यकारभार केला जात होता. महसूल गोळा करताना शेतकऱ्यांवर अन्याय अत्याचार होत होते. शेतकऱ्यांवरील हे अन्याय ब्रिटिश राजवटीने थांबवून महसुलासाठी रयतवारी पद्धतीचा अवलंब केला. एल्फिन्स्टनने मुलकी प्रशासनावर जास्त लक्ष केंद्रित केले. मराठी भाषिक प्रदेशाचे पाच जिल्ह्यांत विभाजन केले. सुमारे ७० हजार रुपये महसूल प्रत्येक जिल्ह्यातून जमा होत होता. प्रत्येक जिल्ह्याचा प्रमुख म्हणून कलेक्टरची नियुक्ती केली. इंग्रज गृहस्थाचीच त्याच्यावर वर्णी लावली. त्याच्या मदतीला डेप्युटी कलेक्टरची नेमणूक केली. जिल्ह्याचे तालुक्यात विभाजन केले. तालुका प्रमुख मुलकी अधिकारी म्हणून मामलेदार या अधिकाऱ्याची नियुक्ती केली. डेप्युटी कलेक्टर व मामलेदार या पदावर भारतीयांची नियुक्ती केली. तालुक्याचा महसूल गोळा करणे, शांतता व सुव्यवस्था टिकविण्यासाठी पोलीस दलाची व्यवस्था करणे, मर्यादित स्वरूपाच्या मुलकी व फौजदारी खटल्याचा न्यायनिवाडा करणे ही कामे त्याला पार पाडावी लागत. कलेक्टरच्या हाती जिल्ह्याची सत्ता केंद्रित करण्यात आली. त्याच्याकडे सारा वसुलीबरोबरच शांतता व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. सारा वसुलीची पद्धत नियमबद्ध करण्यात ब्रिटिश राजवटीला यश आले.

ब्रिटिशांनी खेडे किंवा ग्राम प्रशासनात पूर्वीची पद्धतच चालू ठेवली. खेड्याच्या कारभाराची जबाबदारी पाटील या पदाकडे सुपूर्त केली. पाटलांची नियुक्ती शासनामार्फत केली. पाटलाच्या मदतीला कुलकर्णी या अधिकाऱ्याची नियुक्ती केली. खेड्यातील महसूल गोळा करणे, शांतता व सुव्यवस्था टिकविण्याची दक्षता घेणे, काही प्रमाणात न्यायनिवाडा करणे ही कामे पाटील, कुलकर्णी यांच्याकडे सोपविण्यात आली. त्यांच्या कामावर मामलेदाराचे नियंत्रण असे. मुलकी प्रशासनात या सर्व अधिकाऱ्यांची कामे व अधिकार निश्चित केलेले होते. त्यांच्यात ज्येष्ठताही ठरविली होती. या नव्या व जुन्या पद्धतीच्या संमिश्र व्यवस्थेमुळे मुंबई इलाख्याचा कारभार सुनियंत्रित झाला. या व्यवस्थेमुळे सरकारी अधिकाऱ्यांना स्थानिक जनतेशी दैनंदिन संपर्क साधणे शक्य झाले.

एल्फिन्स्टनने मुंबई इलाख्याच्या प्रशासनाची घडी नीट बसवून लोकांच्या मनात इंग्रजी सत्तेबद्दल विश्वास निर्माण केला. त्यामुळे इंग्रजी सत्तेला स्थैर्य प्राप्त झाले. त्याच्यानंतर जॉन माल्कम, मन्रो, चॅप्लीन, रॉबर्टस्, ग्रॅण्ट यांसारख्या गव्हर्नरनी ती परंपरा पुढे चालू ठेवण्याचा प्रयत्न केला. माल्कम याने सारा वसुली पद्धतीतील दोष दूर करून नवीन पद्धतीची अंमलबजावणी केली. शिक्षणाच्या प्रसारासाठी तो प्रयत्नशील राहिला. त्याने उदारमतवादी धोरणाचा स्वीकार करून परकीय राजवटीविषयी लोकांच्या मनात आपुलकी निर्माण करण्याचे प्रयत्न केले.

**अंतर्गत शांतता :** पेशवेकाळात होणारे दंगे, दरोडे, लूटमार यांपासून समाजाची सुटका करणे आणि शांतता स्थापन करण्याला एल्फिन्स्टनने महत्त्व दिले. प्रत्येक जिल्ह्याला एका प्रमुख पोलीस अधिकाऱ्याची जिल्हाधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली नेमणूक केली. अंतर्गत शांतता व सुरक्षितता स्थापन करणे, दंगे, लूटमार, चोरी करणाऱ्यांचा बीमोड करणे, संरक्षण कार्यासाठी पोलीस दलाची उभारणी करणे, नागरिकांच्या जीविताला व वित्ताला संरक्षण मिळवून देणे ही कामे या विभागाकडे सोपविली. खेड्यातील परंपरागत रखवालदारांवर या अधिकाऱ्यांचे नियंत्रण स्थापन केले. थोड्याच काळात हा विभाग दरोडेखोर, लुटारू यांचा बीमोड करण्यात यशस्वी झाला. ब्रिटिशांनी स्थापन केलेल्या या शांतता व सुव्यवस्थेमुळे या शासनाबद्दल समाजाला आत्मीयता वाटू लागली. शांतता व सुव्यवस्थेमुळे व्यापार, उद्योगधंदे व शेती यांच्या विकासाला चालना मिळाली. मुंबई इलाख्यात एल्फिन्स्टनने भक्कम प्रशासन यंत्रणा निर्माण केली.

**शस्त्रास्त्र नियंत्रण व तुरुंग :** अंतर्गत संरक्षणासाठी १८७८ मध्ये सर्व भारतभर 'शस्त्रास्त्रविषयक कायदा' लागू करण्यात आला. त्यानुसार भारतीयांना शस्त्र बाळगण्यासाठी परवानगीची सक्ती करण्यात आली. मात्र युरोपियनांना अशी सक्ती केली नाही. भारतीयांनी वंशभेद करणाऱ्या कायद्याविरुद्ध नाराजी व्यक्त केली. शांतता व सुव्यवस्थेचा भंग करणाऱ्या गुन्हेगारांना पकडल्यानंतर त्यांना डांबून ठेवण्यासाठी तुरुंगाची व्यवस्था करण्यात आली. मुंबई इलाख्यातही त्याविषयी कायदे करण्यात आले. पुढे सर्व देशभर 'बंदिशाळा कायदा' लागू करण्यात आला. गुन्हेगारांना झालेल्या शिक्षेच्या स्वरूपावरून वेगवेगळ्या तुरुंगात ठेवले जात होते. त्यासाठी तुरुंग अधिकाऱ्यांची नेमणूक केली. तुरुंगात जाचक नियमांचा गुन्हेगाराच्या जीवनावर परिणाम व्हावा अशी व्यवस्था केली.

Scanned with ACE Scanner

**बोर्ड ऑफ रेव्हिन्यू :** १८६० मध्ये संपूर्ण देशासाठी अंदाजपत्राच्या पद्धतीचा स्वीकार केला. प्रत्येक विभागाच्या उत्पन्न व खर्च यांचा यात अंतर्भाव करण्यात आला. प्रांत व जिल्ह्याच्या खर्चावर योग्य नियंत्रण राहील अशी दक्षता घेतली गेली. भारतात महसूल वसुलीचे अधिकार कंपनीला मिळाल्यानंतर नायब दिवाणाकडे वसुलीचे काम सोपविले होते; परंतु त्यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार सुरू झाल्यामुळे वॉरन हेस्टिंग्जने ही पद्धती बंद केली. महसुलासाठी स्वतंत्र 'रेव्हिन्यू कौन्सिल'ची नेमणूक केली. परंतु तीही अकार्यक्षम ठरल्यामुळे 'बोर्ड ऑफ रेव्हिन्यू'ची स्थापना केली. त्या अनुषंगाने महाराष्ट्रात रयतवारी पद्धतीचा स्वीकार केला. जमीन महसूलविषयक अधिकार जिल्हाधिकाऱ्यांवर सोपविले. त्याला इतर अधिकारी साहाय्य करीत असत. ब्रिटिशांनी वनसंपत्तीच्या रक्षणासाठी व वाढीसाठी विशेष प्रयत्न केले. वेगवेगळ्या प्रांतात 'राखीव वने' जाहीर केली. या संपत्तीच्या रक्षणासाठी व कायद्याच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक केली. या दक्षतेमुळे इंग्रजांच्या वार्षिक उत्पन्नात वाढ झाली.

**दळणवळण व संदेशवहनात सुधारणा :** भारतीय प्रदेशावर आपले राजकीय वर्चस्व कायम टिकविण्यासाठी कंपनीला दळणवळण व संदेशवहन गतिशील असणे आवश्यक होते. भारतातील इंग्रजांच्या व्यापारवाढीसाठीही त्याची गरज होती. ब्रिटिशांनी वेगवेगळे मुख्य रस्ते व त्यांना जोडणाऱ्या उपरस्त्यांची निर्मिती केली. त्या अनुषंगानेच महाराष्ट्रात ठाणे ते बोरीबंदर हा पहिला रेल्वेमार्ग सुरू केला. पुढे थोड्याच कालावधीत त्यांनी संपूर्ण देशात रेल्वेचे जाळे उभारले. त्याद्वारे प्रवासी वाहतूक व मालवाहतूक करणे सुलभ झाले. व्यापाराच्या वाढीसाठी या रेल्वेमार्गाचा फार मोठ्या प्रमाणात उपयोग झाला. भारतात टपाल वाहतुकीसाठी डाकघरांची निर्मिती केली. याच्याच जोडीला तारायंत्राची सोय करण्यात आली. महाराष्ट्रातही या सुविधा निर्माण झाल्या. या सुधारणेमुळे संदेशवहन त्वरित होऊ लागले. त्याचा फायदा इंग्रजांना भारतातील आपले वर्चस्व दृढ करण्यासाठी झाला. भारतीयांनाही या सुधारणांचा अप्रत्यक्ष फायदा झाला. दळणवळणाच्या सुविधांमुळे एका प्रांतातून दुसऱ्या प्रांतात जाणे, प्रगत विचारांची माहिती होणे सुलभ झाले. त्यातून समाज प्रबोधन झाले. यातून ऐक्याची भावना वाढीस लागण्यास मदत झाली.

**इतर सुधारणा :** प्रशासनाला उपयुक्त असणाऱ्या इतरही सुधारणा सरकारने केल्या. प्रत्येक प्रांताची व्यवस्थित माहिती उपलब्ध व्हावी म्हणून सर्वेक्षण करण्यात आले. भूगर्भ, पुरातत्त्वीय, ऐतिहासिक दृष्टिकोणातूनही सर्वेक्षण केले. त्या अनुषंगाने प्रत्येक जिल्ह्याचे गॅझेटियर प्रकाशित केले. या गॅझेटियरमध्ये जिल्ह्याची ऐतिहासिक, भौगोलिक, सामाजिक, धार्मिक, व्यापार व उद्योगधंदे, प्रमुख ठिकाणे, लोकसंख्या इत्यादींची माहिती देण्यात आली. कार्यक्षम व सुनियंत्रित प्रशासनव्यवस्थेच्या निर्मितीसाठी त्याचा फायदा ब्रिटिशांना झाला. १८७१ पासून दर दहा वर्षांनी जणगणना करण्यास सुरुवात केली. ब्रिटिशांनी स्थानिक स्वराज्य-संस्थांचा विकास घडवून आणण्यासाठी १८५० मध्ये प्रांतिक सरकारांना अधिकार दिले. मुंबई इलाख्याच्या सरकारने या अधिकाराचा उपयोग करून मुंबई, पुणे, सोलापूर या शहरात नगरपालिका स्थापन करण्याचा कायदा केला. लॉर्ड रिपनने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासाचे जे धोरण राबविले त्याचा फायदा महाराष्ट्राला झाला.

Scanned with ACE Scanner

दळणवळणांच्या सुविधांमुळे देशाच्या औद्योगिकीकरणालाही चालना मिळाली. त्यानुसार १८५१ मध्ये मुंबई येथे कापड गिरणी सुरू झाली. पुढे इतर उद्योगधंदे हळूहळू वेगाने वाढत गेले. सनदी परीक्षेत भारतीयांना प्रवेश मिळाल्यामुळे महाराष्ट्रातील अनेक बुद्धिवान तरुण त्यात दाखल झाले. त्यांनी प्रशासनात प्रवेश केला. वरील भौतिक सुधारणांबरोबरच इंग्रजांनी सामाजिक सुधारणांकडेही लक्ष दिले. काही उदारमतवादी गव्हर्नर जनरलांमुळे बालहत्या, नरबळी, सतीबंदी यांसारख्या अनिष्ट सामाजिक प्रथांवर बंदी घातली गेली. भारतीय समाज-सुधारकांच्या प्रयत्नांमुळे सरकारने त्या अनुषंगाने कायदे केले. मात्र, धार्मिक सुधारणेच्या बाबतीत सरकारने सावध पावले उचलली होती. या सर्वांमुळे सामाजिक परिवर्तनाचा एक नवा दृष्टिकोण तयार झाला.

## २. कायदा व न्यायव्यवस्था

कार्यक्षम प्रशासनयंत्रणेची उभारणी करताना ब्रिटिशांनी कायदा व न्यायव्यवस्थेच्या क्षेत्राकडेही लक्ष देणे गरजेचे झाले होते. महाराष्ट्रात ब्रिटिशांची सत्ता स्थापन होण्याअगोदर सर्व जनतेसाठी एक समान कायदा आणि त्या कायद्याला अनुसरून न्यायदानाची पद्धत अस्तित्वात नव्हती. खेडी ही स्वयंपूर्ण असल्यामुळे तेथील निवाडा, न्याय पंचायतमार्फत केला जात असे. मात्र तिच्या न्यायदानाला कायद्याचा आधार नव्हता. व्यक्तीची जात, सामाजिक दर्जा इत्यादींचा विचार करून न्याय दिला जात असे त्यामुळे एकाच गुन्ह्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे शासन होत असे. त्यामुळे न्यायव्यवस्थेत कमालीचा गोंधळ होता. थोडक्यात, कायदा व न्याय याबाबत निश्चित स्वरूपाची पद्धती नव्हती.

**कायद्यापुढे सर्व समान :** इंग्रजांनी कायद्याच्या बाबत 'कायद्यापुढे सर्व समान' हे महत्त्वाचे तत्त्व अंगीकारले. राज्यातील सर्व व्यक्ती कायद्यापुढे समान आहेत हे धोरण ब्रिटिशांनी लागू केल्यामुळे न्यायदानाच्या क्षेत्रातील भेदभाव कमी होण्यास मदत झाली. सर्वांसाठी समान कायदा हे तत्त्व इंग्रज राज्यकर्त्यांनी स्वीकारल्यामुळे न्यायव्यवस्थेच्या आधुनिकीकरणाला चालना मिळाली. सन १८३३ च्या सनद कायद्यानुसार प्रांतांचा कायदेविषयक अधिकार काढून घेण्यात आला. कायदेविषयक सर्व अधिकार गव्हर्नर जनरल व त्याच्या कार्यकारी मंडळाकडे सुपूर्द करण्यात आले. त्यांना कायदेविषयक काम प्रभावीपणे करता यावे म्हणून कायद्याचे सखोल ज्ञान असलेल्या व्यक्तीची 'कायदा-सदस्य' म्हणून नियुक्ती करण्याची तरतूद या सनदेत करण्यात आली. १८५३ साली कायदा सदस्याला गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळाचा सर्वसाधारण सदस्य बनविले. तसेच कार्यकारी मंडळाची सदस्य संख्या सहा करण्यात आली. तसेच कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ असे दोन स्वतंत्र विभाग तयार करण्यात आले. त्यात प्रांताचे सदस्य घेण्यात आले. त्याद्वारे कायदे करण्यासाठी स्वतंत्र विधिमंडळाची निर्मिती करण्यात आली. संपूर्ण भारतासाठी कायदे करणारी एक यंत्रणा निर्माण झाली.

**कायद्यांचे संहितीकरण :** ब्रिटिश राजवटीची कायदे क्षेत्रातील उल्लेखनीय सुधारणा म्हणजे 'कायद्यांचे संहितीकरण' होय. ब्रिटिशांच्या पूर्वी भारतात रूढी, प्रथा व वेगवेगळ्या

Scanned with ACE Scanner

प्रकारचे कायदे या आधारे न्यायदान केले जात होते. ब्रिटिशांच्या आमदानीतही पाच वेगवेगळे कायदे प्रचलित होते. हे सर्व कायदे सामाजिक व धार्मिक रूढी, प्रथा - परंपरा या सर्वांचा विचार करून न्यायदान करावे लागत होते. त्यामुळे न्यायक्षेत्रात कमालीचा गोंधळ उडालेला होता. १८३३ च्या सनदेत भारतातील कायद्यांचे सुसूत्रीकरण व संहितीकरण करण्याचा उल्लेख करण्यात आला. त्यानुसार १८३४ मध्ये 'कायदा आयोगा'ची स्थापना करण्यात आली. त्याच्या अध्यक्षपदी लॉर्ड मेकॉले याची निवड करण्यात आली. त्याने भारतीय दंडसंहितेचा एक मसुदा तयार केला. परंतु पुढे त्यावर विशेष कारवाई झाली नाही. पुढे १८५३ च्या सनदेनुसार लंडनमध्ये दुसऱ्या कायदा आयोगाची नियुक्ती केली. त्यांच्याकडे भारतीय कायद्यांचे संहितीकरण करण्याची जबाबदारी सोपविली. या आयोगाने मेकॉलेने तयार केलेल्या संहितीकरणात आवश्यक त्या सुधारणा करून तीन प्रकारच्या कायदेसंहिता तयार केल्या. त्या अनुषंगाने १८६० मध्ये कायदा करून (१) दंडसंहिता (२) दिवाणी न्यायदान प्रक्रिया संहिता (३) फौजदारी न्यायदान प्रक्रिया संहिता अशा कायदेसंहिता मंजूर करण्यात आल्या. या संहितीकरणामुळे भारतीय कायद्यात सुसूत्रता आली. त्यामुळे न्यायदानातील गोंधळ व विस्कळीतपणा दूर झाला.

मुंबई इलाख्यात एल्फिन्स्टन याने न्यायक्षेत्रात काही महत्त्वपूर्ण सुधारणा करण्याचे प्रयत्न केले. इंग्रजांनी बंगाल प्रांतावर वर्चस्व मिळविल्यानंतर न्यायव्यवस्थेत सुधारणा करण्याचे काम वॉरन हेस्टिंग्जने केले. त्याने जिल्हा पातळीवर दिवाणी दाव्यांसाठी 'दिवाणी अदालत' व फौजदारी दाव्यांसाठी 'फौजदारी अदालत' या न्यायव्यवस्थेची सुरुवात केली. त्या न्यायालयाच्या निकालावर अपील करण्यासाठी अनुक्रमे 'सदर दिवाणी अदालत' आणि 'सदर निझामत अदालत' स्थापन केली. त्याच धर्तीवर मुंबई इलाख्यात न्यायव्यवस्था निर्माण केली. त्यात महत्त्वपूर्ण बदल करण्याचे कार्य एल्फिन्स्टनने केले. प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र न्यायालयाची स्थापना करण्यात आली. जिल्हा न्यायालयात एक न्यायाधीश व त्याला साहाय्यासाठी दुय्यम न्यायाधीशांची नियुक्ती केली. जिल्हा न्यायालयात त्याच्या कार्यक्षेत्रातील खटले चालविण्याची तरतूद करण्यात आली. जिल्हा न्यायालयांच्या निवाड्याविरुद्ध अपील करण्यासाठी 'सदर दिवाणी अदालत' या न्यायालयाची निर्मिती केली. लहान खटल्यांच्या बाबतीत न्यायदान करण्यासाठी भारतीय न्यायाधीशांच्या नियंत्रणाखाली कनिष्ठ न्यायालयाची स्थापना करण्यात आली. पुढे १८६१ च्या कायद्यानुसार कलकत्ता, मुंबई व मद्रास येथे उच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आली. दिवाणी व फौजदारी अधिकार असलेल्या उच्च न्यायालयाच्या स्थापनेमुळे पूर्वीची सदर दिवाणी अदालत रद्द झाली. उच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र प्रांता-पुरते मर्यादित करण्यात आले.

इंग्रजांनी भारतात 'कायद्यापुढे सर्व समान' हे तत्त्व जरी स्वीकारले असले तरी त्याची अंमलबजावणी सर्वत्र होत नव्हती. कारण फौजदारी दंडसंहितेनुसार युरोपीय गुन्हेगारावरील खटला भारतीय न्यायाधीशापुढे चालविण्यास बंदी होती. त्यामुळे न्यायदानाच्या क्षेत्रात वर्णभेद स्पष्ट दिसत होता. लॉर्ड रिपनने या अनुषंगाने इल्बर्ट याला १८८३ साली एक विधेयक तयार करावयास सांगितले. त्यानुसार युरोपीय गुन्हेगारावरील खटले भारतीय न्यायाधीशासमोर

Scanned with ACE Scanner

चालविण्याची तरतूद असलेले इल्बर्ट बिल तयार करण्यात आले. परंतु युरोपियनांच्या विरोधामुळे त्यात दुरुस्त्या करणे भाग पडले. त्याला न्यायक्षेत्रातील वर्णभेद पूर्णपणे संपविता आला नाही.

ब्रिटिश सत्तेच्या प्रारंभीच्या काळातील या प्रशासनव्यवस्थेकडे पाहिल्यास त्यांच्या यामागील धोरणांची स्पष्ट जाणीव होते. भारतावर आपली एकसंघ सत्ता स्थापन केल्यानंतर ती सत्ता कायम टिकावी, त्या सत्तेला स्थानिक लोकांचा विरोध होऊ नये आणि व्यापारात वृद्धी व्हावी म्हणून तशा प्रकारची प्रशासन यंत्रणा उभारली. साम्राज्याचे प्रांत, जिल्हे, तालुके असे विभाजन करून त्यावर आपले नियंत्रण निर्माण केले. चोरी, लुटालूट यांच्या बंदोबस्तासाठी पोलीस यंत्रणेची उभारणी केली. त्यांच्याकडे अंतर्गत शांततेची जबाबदारी सोपविली. या यंत्रणेचाच आपणाला पुढील काळात फायदा करून घेता येईल हा उद्देश होता. महसुलाकडे त्यांनी जास्तीतजास्त लक्ष केंद्रित करून महसूल वसुलीची यंत्रणा प्रभावीपणे राबवून मोठ्या प्रमाणात महसूल गोळा केला. तो पैसा मायदेशी नेला. सर्वेक्षण, जनगणना, गॅझेटियर इत्यादींद्वारे संपूर्ण भारतीय समाजाची तपशीलवार माहिती जमा केली. साम्राज्यावर आपली घट्ट पकड ठेवण्यासाठी, व्यापाराच्या वाढीसाठी दळणवळण व संदेशवहनाच्या क्षेत्रात सुधारणा केल्या. मात्र, त्यांनी भारतीयांच्या शेतीची, व्यापाराची व व्यवसायाची वाढ व्हावी म्हणून कोणतीही उपाययोजना केली नाही. उलट वंशश्रेष्ठत्वाचा विचार कायम ठेवला. याचे उदाहरण म्हणजे शस्त्रास्त्रविषयक कायदा आणि सनदी नोकरभरती होय. त्याद्वारे त्यांनी भारतीय लोक कनिष्ठ आहेत इंग्रज हे श्रेष्ठ आहेत हे दाखवून दिले. असे असले तरी प्रशासन यंत्रणेने निर्माण केलेली शांतता व सुव्यवस्था आणि दळणवळणातील सुधारणा यांचा भारतीयांना लाभ झाला. काळाच्या ओघात प्रगत विचार भारतीय समाजात प्रसारित झाले. त्या आधारे सुधारकांना व विचारवंतांना ब्रिटिशांच्या परकीय सत्तेचे खरे स्वरूप भारतीय समाजाला दाखविणे शक्य झाले. यांचा स्वातंत्र्य चळवळीला फार मोठा उपयोग झाला. भारतातील पूर्वीच्या न्यायव्यवस्थेतील विषमता व भेदभाव नष्ट केला. त्यांनी भारतीय कायद्यांचे संहितीकरण केले. सर्व देशासाठी एकच कायदा लागू केला. न्यायालयाच्या कायद्याप्रमाणे न्याय मिळेल याकडे विशेष लक्ष दिले. भारतातील समाजसुधारणेसाठी त्याचा फार उपयोग झाला. भारतातील जातिव्यवस्थेचे निर्बंध सैल होण्यास समानतेचे तत्त्व विशेष उपयुक्त ठरले. भारतीयांना न्यायालयासमोर समानता आली असली तरी न्यायदानाचे काम खर्चीक होते. न्यायदान प्रक्रिया अत्यंत संथपणे होत असल्यामुळे सामान्यांना त्याचा फारसा उपयोग होत नव्हता.

## ३. ब्रिटिशांचे शिक्षणविषयक धोरण

महाराष्ट्रात इंग्रजांची सत्ता स्थापन झाल्यानंतर येथील समाजजीवनात वेगवेगळ्या क्षेत्रांत मोठे बदल घडून आले. भारतात या पूर्वी अनेक राजकीय स्थित्यंतरे झाली. परकीयांनी येथे राजकीय वर्चस्व निर्माण केले. मात्र त्याचा समाजजीवनावर फारसा प्रभाव पडला नाही. अनेक सत्ता भारतात निर्माण झाल्या मात्र समाजजीवनाची चौकट आहे तशीच टिकून राहिली. मात्र त्याला इंग्रजांची सत्ता अपवाद ठरली. १९ व्या शतकात स्थापन झालेल्या या नवीन राजवटीने

Scanned with ACE Scanner

समाजजीवनात अनेक परिवर्तने घडवून आणली. इंग्रजांनी शिक्षणात जे महत्त्वपूर्ण बदल घडवून आणले त्यामुळे समाजसुधारणेला चालना मिळाली. त्यामुळेच महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास पाहताना शिक्षणपद्धतीत झालेले बदल प्रथम पाहणे गरजेचे ठरते. भारतात आणि महाराष्ट्रातील आधुनिक शिक्षण व भौतिक विद्यांच्या अभ्यासाला ब्रिटिश काळापासून आरंभ झाला. ब्रिटिशांनी शिक्षणात आमूलाग्र बदल केले. या शिक्षणामुळे ब्रिटिश राज्यकर्त्यांचा जितका फायदा झाला, त्याच्या कितीतरी पटीने भारतीय समाजाचा फायदा झालेला दिसतो. या शिक्षणामुळेच महाराष्ट्र तसेच भारतातील समाजाच्या जीवनात एक परिवर्तन घडून आले. ब्रिटिशांनी शिक्षणात केलेले बदल आपणास पाहावयाचे आहेत. त्यापूर्वी महाराष्ट्रात शिक्षणाची काय अवस्था होती हे पाहणे उचित ठरेल.

**ब्रिटिशपूर्व काळातील शिक्षणपद्धती :** ब्रिटिशपूर्व काळात भारतात वेद, धर्मशास्त्र, व्याकरण, तर्कशास्त्र यांसारख्या विषयांचेच शिक्षण दिले जात होते. भारतात श्रेणीबद्ध जातिसंस्था होती. त्यामुळे वरिष्ठ वर्गांनाच विशेषाधिकार होते. त्यानुसार त्याच वर्गाची शिक्षणात मिरासदारी होती. कनिष्ठ जाती शिक्षणापासून पूर्णपणे वंचितच होत्या. त्यामुळे समाज शिक्षणाविषयी उदास होता. भारताप्रमाणेच महाराष्ट्रातही शिक्षणाची हीच अवस्था होती. मराठी सत्तेच्या प्रारंभीच्या काळात स्वराज्य स्थापना व नंतरच्या काळात साम्राज्यविस्तार यामुळे शासनकर्त्यांना शिक्षणाकडे लक्ष देता आले नाही. पेशवाईच्या उत्तरार्धात काही शास्त्री व पंडितांनी खाजगी पाठशाळा सुरू केलेल्या होत्या. या पाठशाळांतून व्याकरण, न्याय, ज्योतिष, धर्मशास्त्र, वेद यांसारख्या विषयांचे शिक्षण दिले जात होते. शिक्षण घेण्यात ब्राह्मण मुलांचाच भरणा असल्यामुळे धार्मिक शिक्षणावर भर दिला जात होता. पौरोहित्यावर चरितार्थ चालत असल्यामुळे धार्मिक शिक्षण घेण्याकडेच कल होता.

मोठी खेडी व शहरातून मुलांना शिक्षण देणाऱ्या खाजगी शाळा असत. त्यांना 'तात्या-पंतोजीच्या शाळा' असे संबोधले जात होते. शाळा देऊळ, चावडी यांसारख्या सार्वजनिक ठिकाणी भरत. हस्तलिखित पोथ्यांच्या साहाय्याने मुलांना शिकविले जात होते. पाठांतराला या शाळांमधून विशेष महत्त्व दिले जाई. श्रीमंत वर्गाचीच मुले तेथे शिक्षण घेत. कनिष्ठ वर्गाला किंवा जातींना शिक्षणाचा अधिकार नाही असेच मानले जात होते. व्यावहारिक उपयुक्ततेसाठी आवश्यक तेवढेच पारंपरिक शिक्षण दिले जात होते. पेशवाईच्या अखेरच्या काळात श्रावण महिन्यात विद्वान ब्राह्मणांना दक्षिणा दिली जात असे. प्रारंभीच्या काळात विद्वानांची परीक्षा घेऊन त्यांच्या विद्वत्तेप्रमाणे दक्षिणा दिली जात असे. नंतर मात्र या दक्षिणेचे स्वरूप बदलून त्याला दानधर्माचे स्वरूप मिळाले. शेवटी ही दक्षिणेची रक्कम पाच लाखांपर्यंत वाढविली. पेशवाईच्या अखेरच्या काळातच राज्यकर्त्यांचा युरोपीय लोकांशी संबंध आला. युरोपियनांनी भौतिकशास्त्राचा अभ्यास करून कशी प्रगती केली आहे हे भारतीय राज्यकर्त्यांनी पाहिले. मात्र पाश्चात्त्याप्रमाणे शिक्षणात बदल घडवून आणावे असे कोणासही वाटले नाही. आधुनिक शिक्षणाचे श्रेय इंग्रजांनाच द्यावे लागते.

**ब्रिटिश राजवटीतील शिक्षणाचे स्वरूप :** ब्रिटिश राजवटीत महाराष्ट्रात सार्वत्रिक

Scanned with ACE Scanner

शिक्षणप्रसाराला सुरुवात झाली. त्यांनी पारंपरिक शिक्षणपद्धतीत आमूलाग्र बदल घडवून आणले. सर्व जातिधर्मांच्या लोकांना शिक्षणाची द्वारे खुली करून दिली. शिक्षणाच्या संदर्भात आणखी एक महत्त्वाचा बदल झाला. तो म्हणजे प्रारंभीच्या शासनकर्त्यांनी शिक्षणाच्या प्रसाराची जबाबदारी नाकारली होती. मात्र, ईस्ट इंडिया कंपनीने शिक्षणप्रसाराची जबाबदारी स्वीकारली. त्यातच इंग्लंडच्या पार्लमेंटने भारतीयांच्या शिक्षणासाठी दरवर्षी ठरावीक रक्कम खर्च करावी असे बंधन सरकारवर घातले. त्यामुळे शिक्षणप्रसार सरकारी पातळीवरून सुरू झाला. या अगोदरच ख्रिश्चन मिशनऱ्यांनी भारतात मानवतेच्या भूमिकेतून शिक्षण देण्यास सुरुवात केली. ख्रिश्चन धर्माचा प्रसार करणे हा यामागील मुख्य उद्देश होता. ब्रिटिश राज्यकर्त्यांना प्रशासनात कारकुनांची गरज होती. शिक्षणाद्वारेच त्यांना कारकून मिळणे शक्य होते. आपल्या सांस्कृतिक श्रेष्ठत्वाचे गुणगाण करणारा एक वर्ग त्यांना करावयाचा होता. अल्प शिक्षणाद्वारे तसा वर्ग तयार करणे शक्य होते. इंग्लंडमध्ये तयार होणाऱ्या विविध प्रकारच्या वस्तू खपविण्यासाठी नवशिक्षित वर्ग उपयोगी ठरणार होता. त्याद्वारे व्यापारवृद्धी होणार होती. असे असले तरी काही विद्याप्रेमी इंग्रज अधिकाऱ्यांना मात्र भारतीय समाजाला शिक्षणाद्वारे नवीन विषयाचे ज्ञान द्यावे अशी मनापासून इच्छा होती. अशा विविध हेतूनेच भारतात आधुनिक शिक्षणाचा पाया घातला.

ख्रिश्चन मिशनऱ्यांनी अनेक ठिकाणी अनेक अडचणींवर मात करून शाळा सुरू करून शिक्षण देण्यास सुरुवात केली होती. मुंबई इलाख्यात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी १८१५ मध्ये मुंबई येथे 'बॉम्बे एज्युकेशन सोसायटी' या संस्थेची स्थापना झाली. कंपनीच्या नियंत्रणाखालील प्रदेशात राहणाऱ्या गरीब लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे हा या संस्थेचा मुख्य उद्देश होता. या कामी एल्फिन्स्टन याने पुढाकार घेतला होता. देशी भाषेतून ग्रंथनिर्मिती करण्यासाठी एल्फिन्स्टन यांच्या प्रेरणेतूनच १८२० साली 'दि नेटिव्ह स्कूल अ‍ॅण्ड स्कूल बुक कमिटी' ही संस्था स्थापन झाली. या संस्थेतर्फे मुंबईत अनेक शाळा सुरू झाल्या. तसेच गुजराथी व मराठी भाषेत इंग्रजी पुस्तकांची भाषांतरे झाली. मुंबई येथे १८२४ मध्ये इंग्रजी शाळेची स्थापना झाली. त्याच शाळेला पुढे 'एल्फिन्स्टन हायस्कूल' असे नाव देण्यात आले. दरम्यान, १८२३ साली जगन्नाथ शंकरशेठ यांनी 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' ही संस्था स्थापन केली. या संस्थेने मुंबई व मुंबईबाहेर अनेक शाळा सुरू केल्या. त्यामुळे शिक्षणप्रसाराला चालना मिळाली. १८३४ मध्ये मुंबईत 'एल्फिन्स्टन कॉलेज' सुरू झाले.

**पुण्यात संस्कृत कॉलेजची स्थापना** : सन १८१८ मध्ये पुण्यातील पेशव्यांची सत्ता इंग्रजांनी नष्ट केली. इंग्रजी सत्ता आल्याने पुण्यातील उच्चवर्णीयांत असंतोष निर्माण झाला. या असंतोषाचा उद्रेक होऊ नये म्हणून एल्फिन्स्टनने मुत्सद्देगिरीने निर्णय घेतला. पुण्यात श्रावणमासाच्या दक्षिणेत पाच लाख रुपये खर्च केले जात होते. यातील काही रक्कम खऱ्या अर्थाने विद्वानांना उत्तेजन देण्याच्या हेतूने व शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून १८२१ मध्ये पुण्यात 'संस्कृत कॉलेज' नावाची संस्था एल्फिन्स्टनने सुरू केली. या कॉलेजमध्ये वेद, वेदांगे, न्याय, व्याकरण, ज्योतिष यांसारख्या विषयांच्या शिक्षणाची तेथे सोय केली. शिक्षणाचे

Scanned with ACE Scanner

माध्यम संस्कृत ठेवण्यात आले. १८३७ मध्ये तेथील अभ्यासक्रमात मराठीचा समावेश करण्यात आला. १८५१ मध्ये तेथे संस्कृतऐवजी इंग्रजी भाषेला प्राधान्य देण्यात आले. तसेच या कॉलेजचे 'पुना कॉलेज' असे नाव बदलले. १८६२ मध्ये या महाविद्यालयाचे दोन भाग करण्यात आले. इंग्रजीतून उच्च शिक्षण देणाऱ्या कॉलेजला 'डेक्कन कॉलेज' व मराठीतून उच्च शिक्षण देणाऱ्या कॉलेजला 'व्हर्नाक्युलर कॉलेज' असे नाव देण्यात आले. परंतु पुरेशा विद्यार्थी संख्येअभावी या कॉलेजचे रूपांतर 'ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन' या कॉलेजमध्ये करण्यात आले. डेक्कन कॉलेजमधून लोकमान्य टिळक, आगरकर, विष्णुशास्त्री चिपळूणकर यांसारख्या विद्वानांनी शिक्षण घेतले. ते कॉलेज महाराष्ट्रात सर्वांगीण प्रगत समाजाचे स्फूर्तिकेंद्र बनले.

महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार घडवून आणण्याच्या बाबतीत एल्फिन्स्टनचे योगदान मोठे आहे. तो मुंबई इलाख्याचा गव्हर्नर होता. तो उदारमतवादी होता. प्रजेच्या हिताचा विचार करूनच त्याने शिक्षणाला प्राधान्य दिले. त्याने शिक्षणप्रसार करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांना मदत केली. 'बॉम्बे एज्युकेशन सोसायटी'च्या स्थापनेत त्याचा पुढाकार होता. नाना शंकरशेठ यांच्या शैक्षणिक कार्यास त्याने पाठबळ दिले. सरकारी पातळीवरून त्याने शिक्षणप्रसाराला चालना दिली.

**इंग्रजी शिक्षणाची सुरुवात :** शिक्षणविषयक प्रगतीच्या सुरुवातीपासूनच या विविध शाळा व महाविद्यालयांतून इंग्रजी भाषेतून शिक्षण द्यावे किंवा भारतीय भाषांतून शिक्षण द्यावे याविषयी वाद निर्माण झाला होता. तसेच शिक्षणात पाश्चिमात्य शिक्षणाला महत्त्व द्यावे किंवा पौर्वात्य शिक्षणाला महत्त्व द्यावे याविषयी मतभिन्नता होती. भारतीय लोकांचा या शिक्षणसंस्थांतून भारतीय भाषांतून शिक्षण दिले जावे असा आग्रह होता तर कंपनीच्या काही अधिकाऱ्यांना पाश्चिमात्य शिक्षण इंग्रजी माध्यमातून दिले जावे असा आग्रह होता. कंपनीचा अधिकारी चार्लस् गँट याने इंग्रजी माध्यमाच्या कल्पनेचा पहिल्यांदा जाहीर पुरस्कार केला.

सन १८१३ च्या सनदेने इंग्लंडच्या पार्लमेंटने कंपनी सरकारवर भारतीय जनतेला उपयुक्त शिक्षण देण्यासाठी प्रतिवर्षी एक लाख रुपये खर्च करावेत असे बंधन घातले. पाश्चात्त्य की पौर्वात्य शिक्षण द्यावे असा वाद उत्पन्न झाल्यामुळे कंपनीने शिक्षणाकडे फारसे गांभीर्याने पाहिले नाही. शेवटी १८२३ साली बंगाल प्रांतात 'कमिटी ऑफ पब्लिक इंस्ट्रक्शन' ही समिती नेमली. या कमिटीने प्रारंभीच्या काळात पौर्वात्य शिक्षणपद्धती आणि देशी भाषांचे माध्यम यावर विशेष भर दिला. तथापि, अलेक्झांडर डफ व लॉर्ड मेकॉले यांची या समितीवर सभासद म्हणून नियुक्ती झाल्यावर त्यांनी पाश्चात्त्य पद्धतीचे इंग्रजी भाषेतून शिक्षण द्यावे असा आग्रह धरला. पुढे १८३४ मध्ये मेकॉले हा या समितीचा अध्यक्ष झाला. तो इंग्रजी माध्यमाचा पुरस्कर्ता होता. लॉर्ड बेंटिंग या उदारमतवादी गव्हर्नर जनरलने मेकॉलेचे मत मान्य केले. ७ मार्च, १९३५ रोजी कंपनी सरकार यापुढे केवळ इंग्रजी शिक्षणासाठीच पैसा खर्च करेल असे त्याने जाहीर केले. त्याच्या या निर्णयामुळे पाश्चात्त्य पद्धतीचे शिक्षण व इंग्रजी माध्यमाला महत्त्व मिळाले. गव्हर्नर जनरल लॉर्ड हार्डिंग्जने इंग्रजी शिक्षण घेतलेल्या व्यक्तीलाच शासकीय नोकऱ्यांत प्राधान्य दिले जाईल असे जाहीर केले. त्यामुळे इंग्रजी शाळांना महत्त्व प्राप्त झाले.

Scanned with ACE Scanner

भौतिकशास्त्रांच्या अभ्यासाचे समाजाला महत्त्व वाटू लागले. त्यामुळे प्रगत विद्या व तत्त्वज्ञान याची समाजाला माहिती मिळू लागली. समाजात शासकीय नोकरी करणाऱ्या, व्यापार करणाऱ्या लोकांची प्रतिष्ठा वाढीस लागली. भौतिक व सामाजिक शास्त्रामधील या प्रगत विचारांच्या अभ्यासामुळे समाज गतिशील बनला. बुद्धिप्रामाण्यवादाला महत्त्व प्राप्त झाले.

**बोर्ड ऑफ एज्युकेशन :** महाराष्ट्रातील शिक्षणाला निश्चित दिशा देण्यासाठी आणि शैक्षणिक प्रसारात सुसूत्रता आणण्यासाठी सन १८४० मध्ये ब्रिटिश शासनाने मुंबई येथे 'बोर्ड ऑफ एज्युकेशन' हे मंडळ स्थापन केले. त्यात तीन सरकार व तीन बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचे प्रतिनिधी यांचा समावेश होता. महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासात या मंडळाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. हे मंडळ १५ वर्षे कार्यरत राहिले. या मंडळामार्फत शाळा सुरू करण्याचे आणि त्या शाळांना मान्यता देण्याविषयीचे नियम तयार केले. प्रत्येक इयत्तेनुसार अभ्यासक्रम तयार केला. शिक्षणात भारतीय भाषांना उत्तेजन मिळावे म्हणून गुजराथी व मराठी भाषेतून ग्रंथनिर्मिती केली. शाळा तपासणीसाठी मुंबई इलाख्याचे तीन विभाग पाडून प्रत्येक विभागावर 'सुपरिटेंडन्ट' हा अधिकारी नेमला. महाराष्ट्रात शैक्षणिक प्रगती घडवून आणण्यात या मंडळाचा सहभाग मोठा होता. त्यामुळेच महाराष्ट्रात अनेक इंग्रजी व मराठी शाळा सुरू झाल्या.

**सर चार्लस् वूडचा शिक्षणविषयक खलिता :** कंपनीचे प्रयत्न व सुधारकांनी केलेले प्रयत्न यामुळे शैक्षणिक विकासाला महाराष्ट्रात गती मिळाली. लॉर्ड मेकॉलेच्या प्रयत्नामुळे इंग्रजी शिक्षणाचे महत्त्व वाढले. लॉर्ड बेंटिंगने भारतात इंग्रजी शिक्षणाला चालना देणारे धोरण अंगीकारले त्यामुळे शैक्षणिक उठावात भर पडली होती. लॉर्ड मेकॉलेने मांडलेल्या झिरपण्याच्या सिद्धांताचा स्वीकार केलेला होता. समाजात काहींना उच्च शिक्षण द्यावे, नंतर ते समाजाच्या खालच्या थरापर्यंत झिरपत जाईल अशी या सिद्धांतामागील भूमिका होती. त्याला फिल्टरेशन थेरी असे म्हटले जात होते. पेरीने १८४२ मध्ये या सिद्धांतानुसार शिक्षणाची पुनर्आखणी केली होती. त्यामुळे शिक्षणक्षेत्रात झालेल्या प्रगतीचे सर्वेक्षण करून शैक्षणिक पुनर्रचनेच्या संदर्भात एक सविस्तर धोरण आखण्याची कंपनी सरकारला गरज वाटू लागली. त्या अनुषंगाने विचार करून खलिता तयार करण्यासाठी १८५४ मध्ये सर चार्लस् याच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. वूडनीं अत्यंत परिश्रमपूर्वक भारतातील शैक्षणिक धोरणाची मीमांसा करणारा खलिता १९ जुलै, १८५४ रोजी सादर केला. या खलित्यात शंभर परिच्छेदांमध्ये भारतीय शिक्षणपद्धतीची आणि अनुषंगाने स्वीकारावयाच्या धोरणांची सविस्तर चर्चा केलेली आहे. भारतीय शिक्षण-पद्धतीविषयी त्यांनी केलेल्या चर्चेचा गोषवारा पुढीलप्रमाणे-

१. शासनाने आपल्या कर्तव्यात शिक्षणाचा समावेश करावा.

२. शिक्षणाचे माध्यम म्हणून देशी भाषांना प्रोत्साहन द्यावे.

३. खासगी शिक्षणसंस्थांना शाळा काढण्यास प्रोत्साहन द्यावे. त्या शाळांना सरकारमार्फत अनुदान द्यावे.

४. शिक्षणात कनिष्ठ पातळीपासून वरिष्ठ पातळीपर्यंत सुसूत्रता असावी.

Scanned with ACE Scanner

५. प्रत्येक प्रांतात प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, महाविद्यालये पुरेशा प्रमाणात असाव्यात. तेथे देशी भाषेतून शिक्षण द्यावे किंवा आंग्ल-मराठी असावे.

६. शिक्षणाच्या व्यवस्थेत सुसूत्रता येण्यासाठी आणि शाळांची तपासणी करण्यासाठी प्रत्येक प्रांतात स्वतंत्र शिक्षणखाते सुरू करावे.

७. उच्च शिक्षणाचे नियंत्रण करण्यासाठी मुंबई, कोलकता व चेन्नई या ठिकाणी लंडन विद्यापीठाच्या धर्तीवर विद्यापीठांची स्थापना करावी. परीक्षा घेण्याचे काम त्यांनी करावे.

८. पदवीपर्यंतचे शिक्षण महाविद्यालयात देण्यात यावे. महाविद्यालये विद्यापीठाशी संलग्न असावीत.

९. स्त्री-शिक्षणाला उत्तेजन द्यावे.

१०. समाजातील सर्वसामान्य लोकांपर्यंत शिक्षण पोहोचण्यासाठी प्रयत्न करावेत.

११. शिक्षण हे धर्मातीत असावे.

चार्लस् वूड यांनी शिक्षणाविषयी केलेल्या सूचना म्हणजे भारतातील भविष्यकाळातील मार्गदर्शक तत्त्वे होती. चार्लस् वूड यांच्या खलित्यात केलेल्या सूचनानुसार लॉर्ड डलहौसीने शिक्षणाची पुनर्रचना करण्याचे कार्य हाती घेतले. कंपनीच्या अखत्यारीखालील प्रांतात एका वर्षात शिक्षण खाते सुरू केले. त्याचप्रमाणे अभ्यासक्रम, परीक्षा पद्धती, अनुदान देण्याची पद्धत यात सुसूत्रता आणली. शाळांच्या तपासणीसाठी स्वतंत्र अधिकारी नेमले. १८५७ मध्ये मुंबई, चेन्नई, कोलकता येथे विद्यापीठांची स्थापना केली. उच्च शिक्षणावरील नियंत्रणाचे काम त्यांच्याकडे सोपविले. सर चार्लस् वूडच्या खलित्याने शैक्षणिक प्रगतीला गती मिळाली.

**हंटर आयोग :** चार्लस् वूडच्या खलित्याचा स्वीकार केल्यानंतर शिक्षणक्षेत्रात झालेल्या प्रगतीची पाहणी करून पुढील काळासाठी त्यात आवश्यक सुधारणा सुचविण्यासाठी लॉर्ड रिपन याने सन १८८२ मध्ये सर विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली आयोगाची स्थापना केली. त्याला हंटर आयोग किंवा कमिशन या नावाने उल्लेखले जाते. या आयोगाने संपूर्ण देशाचा दौरा करून प्रत्येक प्रांताच्या शिक्षणाची पाहणी केली. अनेक शिक्षणक्षेत्रातील तज्ज्ञांनी विचार-विनिमय करून आपला अहवाल तयार करून सरकारला सादर केला. या अहवालातील महत्त्वाच्या शिफारशी पुढीलप्रमाणे-

१. खाजगी शिक्षण संस्थांना शैक्षणिक कार्यात प्रोत्साहन द्यावे. त्यांना अनुदान द्यावे.

२. शिक्षणावरील सरकारी नियंत्रण कमी करावे.

३. महाविद्यालयांना आर्थिक साहाय्य करावे.

४. प्राथमिक शिक्षण स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सोपवावे. सरकारने त्यावर नियंत्रण ठेवावे.

५. लोकशिक्षणाकडे काळजीपूर्वक लक्ष द्यावे.

६. शासकीय शाळा खाजगी संस्थांकडे सुपूर्त करावे.

Scanned with ACE Scanner

७. प्रांतिक सरकारांनी आपल्या उत्पन्नापैकी ठरावीक हिस्सा शिक्षणासाठी राखून ठेवावा.

हंटर आयोगाने भारतातील शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीविषयी प्रशंसा केली. मात्र प्राथमिक शिक्षणात असलेली हेळसांड दूर करण्यासाठी सरकारने लक्ष द्यावे असे प्रतिपादन केले. शासनाने १८८४ मध्ये हंटर आयोगातील काही सूचना वगळून बाकीच्या शिफारशी स्वीकारल्या. पुढील काळात प्राथमिक शिक्षणाकडे विशेष लक्ष देण्यात आले. खाजगी शिक्षण संस्थांना द्यावयाच्या अनुदान पद्धतीचे सूत्र निश्चित झाल्यामुळे खाजगी संस्थांना प्रोत्साहन मिळाले. पुढील काळात शिक्षणाच्या प्रगतीला गती मिळाली.

महाराष्ट्रातील शैक्षणिक प्रगतीचा आपण आढावा घेतला. इंग्रजांनी काही गृहीतके मनात ठेवून भारतातील शैक्षणिक प्रगतीला चालना दिली. मात्र त्याचे दूरगामी परिणाम झाले. महाराष्ट्रातील शिक्षणातील बदलाचे समाजजीवनावर परिणाम झाले. ते पुढीलप्रमाणे-

१. महाराष्ट्रात ब्रिटिश राजवटीत आधुनिक शिक्षणाची सुरुवात झाली. त्यामुळे शिक्षणात अनेक सुधारणा झाल्या. परिणामी, लोकांना भौतिक ज्ञान व पाश्चिमात्य शिक्षण घेण्याची संधी मिळाली.

२. कंपनी सरकारने लोकांना शिक्षण देण्याची जबाबदारी स्वीकारली. त्यामुळे महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार झाला. परकीय सत्तेने एतद्देशीय प्रजेला शिक्षण देण्याची जबाबदारी स्वीकारणे ही विशेष बाब होती.

३. शिक्षणातील उच्चवर्णीयांची मक्तेदारी नष्ट करण्यात आली. समाजातील सर्व जातिधर्मांच्या लोकांना समानतेने शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून दिली. परिणामी, नवसुशिक्षित लोकांनी पुढील काळात जातीयतेला विरोध केला. तसेच सुधारणांसाठी आग्रह धरला.

४. पाश्चात्त्य शिक्षणामुळे आधुनिक विचार समाजात रुजू लागले. सुशिक्षितांना समाजातील अंधश्रद्धा, अनिष्ट चालीरीती, जातीयता यांच्यातील फोलपणा दिसला. त्यातील काहींनी याविरुद्ध आवाज उठविला. त्यामुळे समाजसुधारणेच्या चळवळीचा पाया घातला गेला.

५. सरकारच्या शैक्षणिक धोरणामुळे ख्रिस्ती मिशनरी आणि समाजसुधारक यांनी या क्षेत्रात मौलिक कामगिरी केली. मिशनऱ्यांनी पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीसाठी फार मोठे परिश्रम घेतले. त्यांनी समाजातील दुर्बल घटकांपर्यंत शिक्षण पोहोचविण्याचा प्रयत्न केला. मुलींच्या शिक्षणासाठीही प्रयत्न केले.

६. राज्यकारभारासाठी आवश्यक असा कारकून वर्ग निर्माण व्हावा असा दृष्टिकोण सरकारचा होता. तो शैक्षणिक प्रगतीमुळे सफल झाला. तसेच व्यवसायाला चालना देणारा वर्ग या सुशिक्षितांतूनच पुढे आला.

७. इंग्रजी शिक्षणामुळे देशाच्या विविध भागांतील लोकांशी संपर्क वाढीस लागला. इंग्रजी ही संपर्क भाषा बनल्यामुळे वेगवेगळ्या प्रांतांतील वेगवेगळ्या भाषा बोलणाऱ्या लोकांत

Scanned with ACE Scanner

सुसंवाद साधला गेला. त्यातून राष्ट्रीय विचारांना चालना मिळाली. भारतातील राष्ट्रवादाच्या चालनेस इंग्रजी भाषा व पाश्चात्त्य ज्ञान यांचा मोठा हातभार लागला.

८. पाश्चात्त्य जगतातील स्वातंत्र्य, समता, बंधुता या विचारांनी प्रभावित झालेल्या समाजसुधारकांनी जनजागृतीचे कार्य केले.

तथापि, भारतीय व महाराष्ट्रातील समाजाच्या दृष्टीने या शिक्षणाचे मोठे फायदे झाले. नवविद्यांच्या अभ्यासामुळे व स्वातंत्र्य, समता, आर्थिक स्थैर्य इत्यादी विचारांच्या प्रेरणेने प्रभावित झालेल्या तरुणांनी लोकजागृतीसाठी आपले आयुष्य वेचले. मराठीतून वृत्तपत्रे, नियतकालिके सुरू झाली. सार्वजनिक वाचनालये, संमेलने इत्यादींद्वारे समाजजागृती केली. भारतात एकराष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्याचे श्रेय या शिक्षणपद्धतीलाच द्यावे लागते. इंग्रजी सत्तेने जरी शैक्षणिक प्रगतीसाठी प्रयत्न केले असले तरी शिक्षणाचा प्रसार अत्यंत धिम्या गतीनेच झाला होता असे स्पष्ट होते. असंख्य खेड्यात शिक्षणाचे लोण पोहोचले नव्हते. असे चित्र दिसत असले तरी कंपनीच्या आमदानीत शिक्षणक्षेत्रात क्रांती होऊ लागली होती याकडे दुर्लक्ष करून चालत नाही.

## ४. मुद्रण व वृत्तपत्रे

इंग्रजी सत्तेने भारतीयांना दिलेली महत्त्वाची देणगी म्हणजे मुद्रण व वृत्तपत्रे होय. भारतात इंग्रजांची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर मुद्रणकलेचा विकास झाला आणि निरनिराळ्या विभागांत वृत्तपत्रांचा आरंभ व प्रसार झाला. कोणत्याही समाजाचे प्रतिबिंब ज्याप्रमाणे वृत्तपत्रातून पाहावयास मिळते, त्याचप्रमाणे समाजात वेगवेगळ्या विचारांचा प्रसार केवळ वृत्तपत्रेच करू शकतात. त्यामुळे आधुनिक काळात वृत्तपत्रांना सामाजिक जीवनाचा एक अविभाज्य भाग मानले जाते. लोकशिक्षण व समाजजागृती करण्याचे प्रमुख साधन म्हणून राष्ट्रीय जीवनात वृत्तपत्रांना महत्त्व आहे. देशी व परदेशी विचारांचा प्रसार करणे, विविध घडामोडींची माहिती देणे, त्यातून जनजागृती करणे हे वृत्तपत्रांचे कार्य आहे. मुद्रणकला व वृत्तपत्रे ही परस्परांशी संबंधित आहेत. मुद्रणकलेच्या ज्ञानाशिवाय वृत्तपत्रांची निर्मिती होत नाही. भारतात ब्रिटिशपूर्व काळात मुद्रणकला ज्ञात नव्हती. मराठा सत्तेच्या काळातही पोथ्यांची हस्तलिखिते केली जात होती. मुद्रणाविषयी पूर्णपणे अज्ञानच होते. भारतात मुद्रणकलेचा प्रसार करण्याचे श्रेय ख्रिश्चन मिशनऱ्यांना द्यावे लागते. पाश्चात्त्य देशातील या मिशनऱ्यांना मुद्रणकलेचे ज्ञान होते. भारतात आल्यानंतर धर्मप्रचार करताना लोकांना धार्मिक वाङ्मय उपलब्ध करून देण्याची आवश्यकता भासली. ख्रिश्चन धर्मग्रंथ बायबल व ख्रिश्चन धर्माविषयीचे इतर ग्रंथ भारतीय भाषांत भाषांतर करून समाजात वाटणे त्यांना आवश्यक वाटू लागले. ख्रिश्चन धर्माची चांगली तत्त्वे लोकांच्या मनावर बिंबविण्यासाठी ते गरजेचे होते. त्या दृष्टीने धर्मप्रचारकांनी भारतीय लिप्यांचे टाईप शोधून काढले. त्याचा उपयोग देशी भाषेतील ग्रंथरचनेला मुद्रणकलेचा उपयोग करून देण्याचे श्रेय बंगालमधील श्रीरामपूर येथील डॉ. कॅरे या धर्मप्रचारकाला द्यावे लागेल. 'डॉ. कॅरे यांच्या परिश्रमामुळे आशिया खंडातील ३० ते ४० भाषांमध्ये ख्रिश्चनांच्या बायबलचा प्रसार झाला.' असा लेख डॉ. कॅरे यांच्या कबरीवर कोरलेला आहे. भारतीयांना अज्ञात असलेल्या मुद्रणकलेचा

Scanned with ACE Scanner

प्रारंभ ख्रिश्चन मिशनऱ्यांनी केला. मुंबई इलाख्यात १८१७ मध्ये अमेरिकन मिशनने देवनागरी टाईप वापरून बायबलच्या काही भागांचे मराठीत भाषांतर केले. तेथून पुढे वृत्तपत्र व ग्रंथ-निर्मितीला मराठी भाषेतून चालना मिळाली.

**इंग्रजी वृत्तपत्रांची सुरुवात** : भारतात ब्रिटिशांचे शासन स्थिर झाल्यानंतर येथे इंग्रजी वृत्तपत्रांचा प्रारंभ झाला. भारतात बंगालमध्ये प्रथम वृत्तपत्र सुरू झाले. त्यानंतर मुंबई येथे १७८९ मध्ये 'बॉम्बे हेरॉल्ड' हे साप्ताहिक सुरू झाले. १७९० मध्ये 'बॉम्बे कुरियर' व १७९१ मध्ये 'बॉम्बे गॅझेट' ही वृत्तपत्रे सुरू झाली. ही वृत्तपत्रे इंग्रजांसाठी इंग्रजांकडूनच प्रकाशित केली जात होती. ही वृत्तपत्रे लोकजागृती किंवा भारतीय विचारांचे दर्शन यासाठी नव्हती. इंग्रजांच्या मनोरंजनासाठी व त्यांना बातम्या समजाव्यात हाच त्यांचा उद्देश होता. सरकारी धोरणावर टीका, वाचकांची पत्रे, प्रशासनातील दोष, वैयक्तिक बातम्या, लष्करी घडामोडी इत्यादींच्या बातम्या प्रसिद्ध केल्या जात होत्या. या काळात वृत्तपत्रविषयक कायदे नसले तरी कंपनी सरकारच्या अधिकाऱ्यांच्या मर्जीवर वृत्तपत्रांचे भवितव्य अवलंबून होते. पुढे 'बॉम्बे टाइम्स', 'स्टँडर्ड', 'टेलिग्राफ' ही इंग्रजी वृत्तपत्रे सुरू झाली. रॉबर्ट नाईट यांनी या तिन्ही वृत्तपत्रांचे एकत्रीकरण करून त्याला 'टाइम्स ऑफ इंडिया' हे नाव दिले. मुंबईत गुजराथीमधून १८२२ मध्ये 'मुंबई समाचार' हे देशी भाषेतील पहिले वृत्तपत्र सुरू झाले. १८४० च्या दरम्यान मुंबई इलाख्यात १० युरोपीय व ४ हिंदी नियतकालिके निघत होती. या वृत्तपत्रातील बातम्यांमुळे कंपनीची निंदानालस्ती होते हे कंपनी सरकारच्या अधिकाऱ्यांच्या लक्षात आले. त्यांनी वृत्तपत्रे सेन्सॉर करण्यासाठी प्रयत्न केले. परिणामी, १७९९ मध्ये सेन्सॉरशिप कायदा पास झाला. त्यामुळे कंपनीविरुद्ध येणाऱ्या भडक बातम्यांना पायबंद घातला गेला.

**मराठी वृत्तपत्रांचा प्रारंभ** : ब्रिटिशांच्या शिक्षणविषयक धोरणामुळे भारतीयांना पाश्चात्त्य विचारसरणीचे ज्ञान झाले. या प्रगल्भ ज्ञानाचा प्रसार करून आपल्या समाजाचा विकास घडवून आणावा ही यामागील प्रमुख प्रेरणा महाराष्ट्रात मराठी वृत्तपत्रांच्या निर्मितीमागे होती. मराठी भाषेतील 'दर्पण' हे पहिले वृत्तपत्र बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी, १८३२ रोजी सुरू केले. 'स्वदेशी लोकांमध्ये विलायतेमधील विद्यांचा अभ्यास अधिक व्हावा आणि या देशाची समृद्धी व येथील लोकांचे कल्याण यांविषयी स्वतंत्रपणे व उघड रीतीने विचार करावयास स्थळ व्हावे या हेतूने जांभेकरांनी 'दर्पण' हे वृत्तपत्र सुरू केले. 'दर्पण'च्या पहिल्याच अंकात जांभेकर लिहितात, 'वृत्तपत्रामुळेच युरोपला सज्ञानदशा प्राप्त होऊन त्यांची प्रगती झाली. कित्येक देशांत जे चांगले बदल झाले त्यास वृत्तपत्रांचा हातभार लागला आहे.' यावरून त्यांनी वृत्तपत्रांचे महत्त्व किती अचूक ओळखले होते याची कल्पना येते. सुरुवातीला हे पाक्षिक होते. त्यातील निम्मा मजकूर इंग्रजीत व निम्मा मराठीत लिहिलेला असे. त्यानंतर जांभेकरांनी भौतिकशास्त्राच्या प्रसारासाठी 'दिग्दर्शन' हे मासिक सुरू केले.

मराठी भाषेतील आणखी एक महत्त्वाचे वृत्तपत्र म्हणजे भाऊ महाजनांचे 'प्रभाकर' या साप्ताहिकाचा उल्लेख करावा लागेल. राजकीय जागृती व सामाजिक सुधारणा यांना त्यात प्राधान्य होते. लोकहितवादींची शतपत्रे याच वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाली. १८४२ मध्ये अमेरिकन

Scanned with ACE Scanner

मिशनऱ्यांनी 'ज्ञानोदय' हे इंग्रजी-मराठी पाक्षिक सुरू केले. धर्मप्रचाराचे साधन म्हणून ते सुरू करण्यात आले. या वृत्तपत्रातून हिंदू धर्मातील अनिष्ट चालीरीतीवर टीका केली जात होती. मिशनऱ्यांच्या हिंदू धर्मावरील टीकेला उत्तर देण्यासाठी विष्णुबुवा ब्रह्मचारी यांनी 'वर्तमानदीपिका' हे वृत्तपत्र सुरू केले. त्यांनी हिंदू धर्मातील अपप्रवृत्तींवर टीका केली. सन १८४९ मध्ये प्रथम साप्ताहिक व सन १९०४ पासून दैनिक प्रकाशित होणारे 'ज्ञानप्रकाश' हे पुण्यात सुरू झाले. समाजजीवन, राजकारण, विविध समस्या, सामाजिक-धार्मिक चळवळी, इतिहास संशोधन इत्यादी विविध विषयांची चर्चा या वृत्तपत्रात होत असे. नंतरच्या काळात उपदेशचंद्रिका, विचारलहरी, धूमकेतू, वर्तमानदीपिका, चंद्रिका, इंदूप्रकाश, सोलापूरहून कल्पतरू-आनंदवृत्त, सोलापूर समाचार, सातारा जिल्ह्यातून श्री शाहू, शुभसूचक, महाराष्ट्र मित्र इत्यादी वृत्तपत्रे सुरू झाली.

सन १८८० पर्यंत सुरू झालेल्या वृत्तपत्रातून भारतीय समाजाला पारतंत्र्याची जाणीव होऊ लागली. तथापि, या काळापर्यंत भारतीय समाजात योग्य ती प्रगती, समानतेच्या तत्त्वाचा विकास होईपर्यंत ब्रिटिशांनी या प्रदेशातून निघून जाऊ नये असेच विचार मांडले जात होते. १८८१ मध्ये केसरी वर्तमानपत्र सुरू झाल्यानंतर मात्र भारतीयांना पारतंत्र्य का आले ? स्वराज्य निर्माण होणे किती आवश्यक आहे ? पारतंत्र्य कसे दूर करता येईल ? इत्यादी विषयांची चर्चा सुरू झाली. वृत्तपत्राद्वारे होणाऱ्या प्रबोधनाच्या बाबतीतील तो दुसरा टप्पा होता. केसरीच्या पहिल्या अंकात वृत्तपत्राचे कार्य स्पष्ट करताना संपादक म्हणतात, 'अंधाऱ्या रात्री गस्तवाल्याचे किंवा म्युनिसिपालिटीच्या कंदिलांचे जे काम तेच काम वृत्तपत्रांनी आपले काम समजले पाहिजे.' या काळापर्यंत मार्गदर्शन, प्रेरणा व समाजजागृती ही वृत्तपत्राची कामे आहेत हे स्पष्ट झाले होते. याखेरीज 'विविध ज्ञानविस्तार', 'निबंधमाला', 'पाठशाळा पत्रक', 'ज्ञानसंग्रह' इत्यादी नियतकालिकांचीही सुरुवात झाली. त्यांनी विविध राजकीय व सामाजिक विषयांची मीमांसा करून लोकजागृतीचे कार्य केले. समाजात राष्ट्र भावना विकसित केली. स्वातंत्र्याविषयीचे प्रेम निर्माण केले. इंग्रजी शिक्षणाचा व पाश्चिमात्य ज्ञानाचा तो परिणाम होता.

मुद्रणकलेच्या प्रसारामुळे मुद्रणालयांची वाढ झाली. त्यामुळे ग्रंथनिर्मितीस चालना मिळाली. वृत्तपत्रांचा होऊ लागलेला प्रसाराचा समाजव्यवस्थेवर दूरगामी परिणाम घडून आले. ग्रंथनिर्मितीमुळे ज्ञानाच्या प्रसारास वेग आला. नवीन विचार समाजापुढे आले. त्यातून नवमतवादी विचारवंतांचा वर्ग उदयास आला. त्यातील अनेकांनी सामाजिक सुधारणांचा पुरस्कार केला. ज्ञानाच्या प्रसारामुळे मंद गतीने समाजाची वाटचाल आधुनिकतेकडे सुरू झाली. वृत्तपत्रांनी समाजजागृतीचे बहुमोल कार्य केले. 'दर्पण', 'प्रभाकर' यासारख्या वृत्तपत्रांनी समाजप्रबोधन व ज्ञानप्रसार यावर लक्ष केंद्रित केले. त्यांचा आदर्शवाद व ध्येयनिष्ठा यांचा प्रभाव पुढील काळातील वृत्तपत्रांवर पडला. महाराष्ट्राच्या समाजसुधारणेच्या चळवळीतही वृत्तपत्रांचे योगदान मोठे आहे. भारतीयांच्यात राष्ट्रीय जागृती निर्माण करण्यातही त्यांनी पुढाकार घेतला. असे असले तरी त्या काळातील वृत्तपत्राच्या कार्याला स्वाभाविक मर्यादा पडलेल्या होत्या. त्यातील महत्त्वाची गोष्ट म्हणजे सुशिक्षितांची संख्या कमी होती. त्यामुळे

वृत्तपत्रांचा वाचकवर्ग कमी होता. मोठ्या शहरातच वृत्तपत्र सुरू झाल्यामुळे दळणवळण साधनांच्या कमतरतेमुळे सर्व दूरच्या खेड्यांपर्यंत ती पोहोचू शकली नाहीत. त्यामुळे समाजजागृतीची व्याप्ती मर्यादित राहिली. महाराष्ट्रातील बहुजन समाज या जागृतीपासून दूरच राहिला.

**मुद्रणस्वातंत्र्याविषयी सरकारचे धोरण** : भारतात मुद्रणकलेची सुरुवात १८ व्या शतकाच्या शेवटी युरोपियनांनीच केली. धर्माचा प्रचार, व्यापाराची वाढ व साम्राज्याचे स्थैर्य हाच छपाईमागील युरोपियनांचा मर्यादित हेतू होता. येथील लोकांना मुद्रणस्वातंत्र्य दिले तर आपल्या राजकीय स्थैर्यास त्याचा अडथळा होईल हे युरोपियन जाणून होते. त्यामुळेच ब्रिटिशांनी सुरुवातीच्या काळात मुद्रणकला व मुद्रणस्वातंत्र्य याविषयी आपले धोरण प्रतिकूल ठेवले होते. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी याबाबत सखोल विचार केलेला होता. मुद्रणस्वातंत्र्याच्या आधारे भारतीय समाजात नवीन विचार फैलावतील, त्यांच्यात स्वातंत्र्याचे विचार फैलावले तर ज्या सैनिकांच्या सामर्थ्यावर ब्रिटिशांनी भारतात आपले वर्चस्व वाढविले, त्या सैन्यातही या विचारांचा प्रसार होईल आणि त्यानंतर ब्रिटिशांना भारतात आपली सत्ता टिकविणे अशक्य होईल अशी भूमिका इंग्रजांची होती. मुद्रणस्वातंत्र्य व परकीय सत्तेचे प्रभुत्व या परस्परविरोधी बाबी असून त्यांचा संयोग दीर्घकाळ टिकणे अशक्य आहे. त्यामुळेच एल्फिन्स्टन, मन्रो या उदारमतवादी ब्रिटिश अधिकाऱ्यांनीही भारतीयांना मुद्रणस्वातंत्र्य दिले जाऊ नये, निदान त्यावर बंधने घालावीत अशी मते मांडली होती. मद्रास प्रांताचा गव्हर्नर मन्रोने १८२२ मध्ये असे म्हटले आहे, 'मुद्रणस्वातंत्र्य व परकीयांचे प्रभुत्व या गोष्टी परस्परांशी अगदी विसंगत आहेत आणि त्यांचा संयोग फार काळ टिकणे शक्य तेव्हा जर भारतीय लोकांना खरे मुद्रणस्वातंत्र्य दिले तर त्यांच्या मनात स्वातंत्र्याची आशा निर्माण होणे स्वाभाविकच आहे.' लॉर्ड वेलस्ली, लॉर्ड मिंटो, लॉर्ड ॲमहर्स्ट इत्यादी गव्हर्नर जनरलनी मुद्रणस्वातंत्र्यावर अनेक बंधने घातली. मात्र चार्लस् मेटकाफ याने मुद्रणस्वातंत्र्याबाबत धोरण स्वीकारले. त्याने मुद्रणस्वातंत्र्यावरील अनेक निर्बंध रद्द केले. त्याच्या मते, 'परिणामांचा विचार न करता मुद्रणस्वातंत्र्याद्वारे होणाऱ्या ज्ञानाचे फायदे भारतीय समाजाला उपभोगू देणे हे ब्रिटिश राज्यकर्त्यांचे कर्तव्य आहे. बंधनाच्याद्वारे अज्ञानात राहिलेल्या भारतीय समाजामुळे जर ब्रिटिशांची येथील सत्ता टिकणार असेल तर ती सत्ता म्हणजे या देशाला मिळालेला शाप ठरेल व ही सत्ता नष्ट होणेच आवश्यक ठरेल. उलट, मुद्रणस्वातंत्र्याद्वारे ज्ञानी बनलेल्या समाजात व ब्रिटिश राज्यकर्त्यांमध्ये ऐक्य निर्माण होईल व आज दिसणारा दुरावा राहणार नाही.

सन १८५७ च्या उठावाच्या वेळी काही काळ भारतीयांच्या मुद्रणस्वातंत्र्यावर बंधने घातली. नंतर त्यातील काही बंधने नंतरच्या काळात उठविण्यात आली. पुढील काळात वर्तमानपत्रे मोठ्या प्रमाणात निघाली. त्यांनी जनजागृतीचे काम मोठ्या प्रमाणावर केले. गव्हर्नर जनरल लिटन हा प्रतिगामी वृत्तीचा होता. वृत्तपत्र स्वातंत्र्याच्या धोरणाला त्याचा विरोध होता. त्याने सन १८७८ मध्ये 'व्हर्नाक्युलर प्रेस ॲक्ट' पास केला. या कायद्याने भारतीय

Scanned with ACE Scanner

भाषांतून प्रकाशित होणाऱ्या वृत्तपत्रावर कडक नियंत्रणे लादली. कोणताही मजकूर छापण्यापूर्वी शासकीय नियंत्रणाकडून त्यास मान्यता मिळविणे आवश्यक केले. सरकारविरुद्ध लिखाण करणाऱ्या वृत्तपत्राचे मुद्रक व प्रशासक यांना कडक शासन करण्याची तरतूद करण्यात आली. त्यामुळे भारतीयांनी या कायद्याविरुद्ध आवाज उठविला. सरकारने दडपशाहीचे धोरण स्वीकारले. परंतु भारतीय जनतेचा असंतोष कमी होण्याऐवजी वाढतच गेला. सर्व देशभर निषेधाचे सूर उमटू लागले. भारतीयांच्या असंतोषाची दखल घेऊन लॉर्ड रिपन याने सन १८८२ मध्ये कायद्यातील काही कडक नियम रद्द केले. मात्र, भारतीय वृत्तपत्रांना पूर्ण स्वातंत्र्य मिळाले असे म्हणता येणार नाही. ही बंधने भारतीय वृत्तपत्रावरच होती. अँग्लो-इंडियन वृत्तपत्रांना ती बंधने लागू नव्हती. ब्रिटिश हे वंशश्रेष्ठत्वाचे तत्त्व मानणारे आहेत हे त्यामुळे अधिकच स्पष्ट झाले. परिणामी, भारतीय समाजात आणखीनच असंतोष वाढीस लागला.

## ५. ख्रिश्चन धर्मप्रचारकांचे कार्य

महाराष्ट्रात इंग्रजांची सत्ता स्थिरावल्यानंतर येथील समाजजीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांत बदल घडवून आणले. इंग्रजांच्या राजवटीने भारतातील लोकांना प्रगत विचारसरणी आणि भौतिकशास्त्रे यांची जाणीव करून दिली. ब्रिटिश राजवटीच्या स्थैर्यासाठी त्यांनी येथे भौतिक व प्रशासकीय सुधारणा घडवून आणल्या. त्यामुळे येथे सामाजिक व राजकीय बदलाला सुरुवात झाली. त्यामुळेच भारतातील समाजसुधारकांनी समाजसुधारणेच्या क्षेत्रात मौलिक कार्य केले. जनजागृती करून सुधारणासाठी अनुकूल वातावरण निर्माण केले. या समाजपरिवर्तनात ख्रिश्चन मिशनऱ्यांचेही मोठे कार्य आहे. त्यांनी समाजसुधारणेच्या चळवळीला हातभार लावला. त्यामुळेच महाराष्ट्रातील समाजसुधारणेच्या चळवळीला हातभार लावला. त्यामुळेच महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा अभ्यास करताना मिशनऱ्यांच्या कार्याचीही माहिती करून घेणे गरजेचे आहे.

ख्रिश्चन धर्मात धर्मातत्त्वांचा प्रचार करण्याच्या कार्याला महत्त्वाचे स्थान आहे. धर्मप्रचाराचे कार्य करण्यासाठी स्वतंत्र सेवाभावी संस्था स्थापन केल्या आहेत. या संस्था जगभर ख्रिस्ती धर्माचा व तत्त्वज्ञानाचा प्रचार व प्रसार करत असतात. धर्मप्रचाराचे कार्य करणाऱ्या ज्या संस्था आहेत त्यांना 'मिशन' असे संबोधले जाते. या संस्थांचे प्रतिनिधी म्हणून धर्मप्रसाराच्या कार्यात सेवाभावी वृत्तीने कार्य करणाऱ्या व्यक्तीस 'मिशनरी' असे म्हणतात. धर्मप्रसार करणे हे आपले जीवित कार्य मिशनरी मानतात. त्यांच्या ठिकाणी धर्मप्रचार करताना येणाऱ्या अडचणीवर मात करण्याचे मनोधैर्य व चिकाटी असते. येशू ख्रिस्ताचे संदेश सर्व जगभर पोहोचविण्याचे त्यांचे उद्दिष्ट असते. १५ व्या शतकाच्या अखेरीस पोर्तुगीज खलाशी वास्को-द-गामा याने आफ्रिकेला वळसा घालून भारतात येणारा नवा जलमार्ग युरोपियनांना दाखविला. त्यामुळे पाश्चिमात्य जगतातील व्यापारी मोठ्या प्रमाणात भारतात येऊ लागले. त्याचबरोबर वेमवेगळ्या देशांतील मिशनरी भारतात दाखल झाले. युरोपीय व्यापाऱ्यांनी व्यापाराबरोबरच राजकारणातही प्रवेश केला. भारतातील अस्थिर राजकीय परिस्थिती त्याला कारणीभूत होती. त्यानुसार इंग्रज, फ्रेंच, डच, पोर्तुगीज लोकांनी भारतातील वेगवेगळ्या भागांत वखारी स्थापन केल्या. युरोपियनांच्या

सत्ता वाढत गेल्यामुळे मिशनऱ्यांच्या संख्येतही वाढ होत गेली. भारतातील मागासलेपणा व मोठी लोकसंख्या धर्मप्रसाराला अनुकूल आहे हे मिशनऱ्यांनी ओळखले होते. धर्मप्रचार करणे मिशनऱ्यांचे उद्दिष्ट होते. प्रत्यक्ष धर्मप्रचाराला प्रारंभ न करता निरनिराळ्या मार्गांनी लोकोपयोगी व समाजोपयोगी कामे करून येथील समाजाला आपल्याकडे आकृष्ट करून घेणे व त्यांच्या मनात या धर्माविषयी आकर्षण निर्माण करणे ही त्यांची पद्धती होती.

मिशनऱ्यांनी भारतात अशिक्षित व गोरगरीब लोकांमध्ये ख्रिश्चन धर्माचा प्रसार करावयाचा असे ठरविले होते. भारतातील समाजव्यवस्थेत कनिष्ठ जातीच्या लोकांची स्थिती अत्यंत वाईट होती. सर्व हक्कांपासून हा वर्ग वंचित होता. सर्व बाबींत ते उपेक्षित होते. कनिष्ठ जातीतील लोकांवर समाजाने व धर्मानेही अन्याय केलेला होता. त्यामुळे त्यांना धर्माबद्दल फारसे प्रेम वाटत नव्हते. मिशनऱ्यांनी येथील समाजजीवनाचा अभ्यास करून हे जाणलेले होते. या उपेक्षित लोकांमध्ये धर्मप्रचार चांगला होईल हे त्यांनी ओळखले होते. म्हणूनच या वर्गाच्या कल्याणाच्या अनेक योजना त्यांनी राबविल्या. कनिष्ठ जातीतील लोक दारिद्र्याने ग्रासलेले होते. त्यांच्यात प्रचंड अज्ञान होते. त्यामुळेच मिशनऱ्यांनी या लोकांसाठी मानवतावादी कार्याने व सेवाभावी वृत्तीने कार्य करून आपल्याकडे आकृष्ट करून घेण्यावर भर दिला. त्यामुळेच मिशनऱ्यांनी समाजसेवा, शिक्षणप्रसार इत्यादी क्षेत्रांत मोलाची कामगिरी बजाविली.

**ब्रिटिश सरकारची मिशनऱ्यांविषयी सावध नीती** : वेगवेगळ्या युरोपियन देशातील व्यापारी भारतात आले; तसेच ख्रिश्चन मिशनरीही आले. या व्यापाऱ्यांनी येथील राजकीय परिस्थितीचा अंदाज घेऊन वेगवेगळ्या भागांत आपली सत्ता केंद्रे स्थापन केली. या युरोपियन सत्तांचे मिशनऱ्याविषयी मात्र सारखेच धोरण नव्हते. पोर्तुगिजांनी गोव्यात आपली राजकीय सत्ता निर्माण केली. त्यांनी मिशनऱ्यांना धर्मप्रचाराबाबत उदार आश्रय दिला. फ्रेंच व डचांनीही मिशनऱ्यांना सहकार्य केले. मात्र मिशनऱ्यांविषयी इंग्रजांचे धोरण सावधगिरीचे होते. भारतात आलेल्या इंग्रजांचा व्यापार करणे हा मुख्य हेतू होता. व्यापारातून पुढील काळात त्यांनी या प्रदेशात आपली राजकीय सत्ता स्थापन केली. इंग्रजांना आपले भारतातील राजकीय व व्यापारी हितसंबंधाचे रक्षण करणे आवश्यक वाटत होते. त्यामुळेच त्यांनी आपल्या नियंत्रणाखालील प्रदेशात धर्मप्रचारकांना कार्य करू देण्यास कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सुरुवातीस विरोध केला. मिशनऱ्यांच्या कार्याला विरोध करण्यामागे कंपनी सरकारची अशी भूमिका होती की, 'भारतातील जनता परंपरावादी असून त्यांच्या मनावर धर्माचा विशेष प्रभाव आहे. ब्रिटिश आपल्या धर्मात हस्तक्षेप करीत आहेत असे जाणविल्यास येथील समाजात असंतोष निर्माण होईल व हा असंतोष ब्रिटिशांच्या सत्तेला धोकादायक ठरेल.' कंपनीच्या वरील धोरणामुळे आपल्या नियंत्रणाखालील प्रदेशात ख्रिश्चन मिशनऱ्यांना कार्य करण्यास विरोधच केला. मुंबई इलाख्याचा गव्हर्नर एल्फिन्स्टन यानेही मिशनऱ्यांना प्रोत्साहन दिले नाही. असे असले तरी ख्रिस्ती मिशनरी नाउमेद झाले नाहीत. मिशनऱ्यांनी आपल्या अंगीकृत कार्यावरील निष्ठा आणि चिकाटी या गुणांच्या आधारे विरोधाला डावलून, प्रचंड त्रास सहन करून धर्मप्रचाराचे कार्य चालविलेच होते.

Scanned with ACE Scanner

कंपनी सरकारने ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या बाबतीत विरोधी असलेले धोरण बदलावे, त्यांना काही प्रमाणात धर्मप्रचाराच्या कार्यासाठी सवलती द्याव्यात असा आग्रह विल्बर फोर्स या मिशनऱ्याने इंग्लंडच्या पार्लमेंटकडे धरला होता. त्याचवेळी ईस्ट इंडिया कंपनीला मुदत वाढवून देणारा सनदी कायदा पास होणार होता. त्याच्या प्रयत्नाला काही प्रमाणात यश आले. इंग्लंडच्या पार्लमेंटने १८१३ च्या सनदी कायद्यात असे एक कलम घातले की, मिशनऱ्यांना हिंदुस्थानात वास्तव्य करण्याचे आणि आपले कार्य चालविण्याचे स्वातंत्र्य देण्यात यावे. त्यामुळे पुढील काळात ईस्ट इंडिया कंपनीच्या नियंत्रणाखालील भारतातील प्रदेशात ख्रिश्चन मिशनऱ्यांना धर्मप्रसाराच्या कार्यासाठी संधी मिळाली. महाराष्ट्रात चर्च मिशनरी सोसायटी, स्कॉटिश मिशनरी सोसायटी, लंडन मिशनरी सोसायटी, अमेरिकन मराठी मिशन इत्यादी संस्था धर्म-प्रसाराच्या कामाला जोमाने लागल्या. महाराष्ट्रात या मिशनऱ्यांनी एकदम धर्मप्रसाराचे कार्य केले नाही. महाराष्ट्रातील जातिबंधनात अडकलेल्या कनिष्ठ वर्गाला, अज्ञानी लोकांना व दारिद्र्याने गांजलेल्या समाजाला आपल्या धर्माकडे आकर्षित करण्यासाठी त्याने वेगवेगळे उपाय योजले. कनिष्ठ जातीतील लोकांच्या विकासासाठी शिक्षणसंस्था सुरू करणे, निरनिराळ्या व्याधींनी व साथीच्या रोगांनी ग्रासलेल्या लोकांसाठी दवाखाने सुरू करणे, दुष्काळ, महापूर यांसारख्या नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मदत करणे, कनिष्ठ जातीच्या लोकांना आर्थिक साहाय्य करणे अशी त्यांनी समाजासाठी भरीव कार्ये केली. या सामाजिक कार्यामुळेच समाजातील काही लोक त्यांच्याकडे आकर्षित होत. धर्मांतरासाठी तयार होत. महाराष्ट्रात या मिशनऱ्यांनी अतिशय चिकाटीने, जिद्दीने व प्रसंगी अनेक हालअपेष्टा सहन करून सामाजिक कार्य केले. मात्र त्यांचे सामाजिक कार्य शुद्ध स्वरूपाचे नव्हते. धर्माचा प्रचार करणे हा प्रमुख हेतू सामाजिक कार्यामागे होता.

**ख्रिश्चन धर्माचा प्रसार :** ख्रिश्चन धर्माचा प्रचार करणे हे मिशनऱ्यांचे ध्येय होते. महाराष्ट्रातील अति दूरच्या प्रदेशात जाऊन त्यांनी कार्य करण्यास सुरुवात केली. मुंबई, पुणे, अहमदनगर, नाशिक, सातारा, जुन्नर, शिरूर, हर्णे, बाणकोट आदी ठिकाणी त्यांनी आपली प्रचार केंद्रे उघडली. परदेशातून आलेल्या या मिशनऱ्यांना येथील अपरिचित वातावरणाशी जुळवून घ्यावे लागले. भारतीय संस्कृती, जीवनपद्धती, चालीरीती, भाषा इत्यादी बाबी वेगळ्या होत्या. ग्रामीण भागात दारिद्र्य, रोगग्रस्त माणसे, घाणेरड्या वस्त्या अशा प्रतिकूल परिस्थितीत मिशनऱ्यांनी आपले कार्य जिद्दीने आणि नेकीने केले. सुशिक्षित लोकांनाही त्यांनी ख्रिश्चन धर्मातील उच्च आदर्श तत्त्वे, समानता, नीतितत्त्वे, प्रार्थनेचे महत्त्व यांसारख्या तत्त्वांची महती सांगून त्यांना आपल्याकडे आकृष्ट करण्याचा प्रयत्न चालू केला. याचबरोबर हिंदू धर्मातील अयोग्य चालीरीती, अतिरेकी धार्मिक परंपरा, देवदेवतांच्या कल्पना, तंत्रमंत्रांचे प्राबल्य यांसारख्या निरर्थक गोष्टी लोकांसमोर उघड मांडल्या. हिंदू धर्मातील या धार्मिक व सामाजिक अनिष्ट परंपरांची जाण असलेल्या या सुशिक्षित समाजाला ख्रिश्चन धर्मातील एकेश्वरवाद, आदर्श नीतितत्त्वे, प्रार्थनेचे महत्त्व व सामाजिक जीवनातील समानता याविषयी आकर्षण वाटू लागले. या आकर्षणातूनच विष्णू भास्कर करमरकर, रामकृष्ण विनायक

Scanned with ACE Scanner

मोडक, नारायण शेषाद्री, बाबा पद्मजी यांसारख्या लोकांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला. काही धर्मांतरितांनी ख्रिश्चन धर्मप्रचाराचे कार्य केले. मात्र सुशिक्षित लोकांकडून धर्मांतराला फारच अल्प प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्रातील खेड्यापाड्यांतील अशिक्षित लोकांची मने जिंकण्याचा मिशनऱ्यांनी मार्ग पत्करला. खेड्यात जाऊन गोरगरिबांच्या मुलांना शिक्षण देण्यासाठी शाळा काढल्या. सर्वसामान्य वर्गातील रोगपीडितांची सेवा करण्यासाठी दवाखाने काढले. या दवाखान्यातूनच मोफत औषधोपचार देण्याची व्यवस्था केली. दरिद्री लोकांच्या आर्थिक अडचणी सोडविण्यासाठी आर्थिक साहाय्य देण्याची पद्धतही स्वीकारली. त्यांनी सामान्य लोकांत मिसळून त्यांचा विश्वास संपादन करण्याचे प्रयत्न केले. मात्र कनिष्ठ लोकांतील धर्माविषयीचा अभिमान जागृत असल्यामुळे मिशनऱ्यांच्या धर्मप्रचाराला म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नाही.

मिशनऱ्यांनीही आपल्या धर्माची महती पटवून देण्यासाठी हिंदू धर्मातील अनिष्ट चालीरीती, रूढी, परंपरा यांच्यावर टीका करण्यास सुरुवात केली. मिशनऱ्यांच्या या आक्रमक पवित्र्यामुळे काही परंपरावादी लोकांनी मिशनऱ्यांच्या आक्षेपांना सडेतोड उत्तरे देण्यास सुरुवात केली. त्यांनी हिंदू धर्माचे खरे स्वरूप लोकांसमोर मांडण्यास सुरुवात केली. तसेच ख्रिश्चन धर्मातील वाईट बाबी लोकांसमोर मांडण्यास सुरुवात केली. त्याचप्रमाणे काही मानवतावादी सुधारकांनी आत्मपरीक्षण करून हिंदू धर्मातील अनिष्ट प्रथा, परंपरा दूर करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. त्यातून महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा पाया घातला गेला. महाराष्ट्रात हिंदू धर्मातील पुनरुज्जीवनाची चळवळ सुरू झाली.

**ख्रिश्चन मिशनऱ्यांचे शिक्षणक्षेत्रातील कार्य** : समाजात ख्रिश्चन धर्माचा मोठ्या प्रमाणावर प्रसार होण्यासाठी शिक्षण हे महत्त्वाचे माध्यम आहे हे मिशनऱ्यांनी ओळखून या क्षेत्रात कामगिरी बजावली. मिशनऱ्यांनी महाराष्ट्रातील खेड्यापाड्यांत शाळा सुरू केल्या. शाळा सुरू करताना त्यांना मराठी भाषेची प्रमुख अडचण भासत होती. त्यांनी मराठी भाषा आत्मसात करून मराठी माध्यमाच्या शाळा सुरू केल्या. कनिष्ठ जातीतील मुला-मुलींना शिक्षण देण्यासाठी त्यांनी प्राधान्य दिले. त्यांना मोफत शिक्षणाची सोय केली. मिशनऱ्यांनी आधुनिक अर्थाने ज्यांना शाळा म्हणता येतील अशा शाळा भारतात सुरू केल्या. भारतीय लोकांत शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनीने काही मिशनऱ्यांना स्वखर्चाने भारतात पाठवून प्राथमिक शाळा सुरू केल्या. त्यांना 'चॅरिटी स्कूल' असे संबोधले जात होते. भारतातील गोरगरिबांच्या मुलांना मोफत शिक्षण देणे हा या शाळांचा उद्देश होता. भारतात मुलींच्या शिक्षणासाठी १८१९ मध्ये अमेरिकन मिशनने पहिली शाळा काढली. १९ व्या शतकाच्या दुसऱ्या दशकात गॉर्डन हॉल यांनी डॉ. विल्सन यांच्या मदतीने खेतवाडी व गिरगाव येथे शाळा सुरू केल्या. सन १८२४ मध्ये मुलींसाठी मुंबई येथे शाळा सुरू केली. १८२९ पर्यंत मुलींच्या शिक्षण देणाऱ्या नऊ शाळा महाराष्ट्रात सुरू झाल्या. श्रीमती ह्यूम यांनी मुलींसाठी वसतिगृह व शाळा सुरू केल्या. डॉ. विल्सन यांनी मुंबईत मुस्लीम लोकांच्या मुलांसाठी स्वतंत्र

Scanned with ACE Scanner

शाळा सुरू केली. १८३५ मध्ये त्यांनी मुंबई येथे उच्च शिक्षणासाठी सेंट्रल कॉलेज काढले. त्याचेच पुढे विल्सन कॉलेजमध्ये रूपांतर झाले.

**अमेरिकन मराठी मिशन :** शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या मिशनरी संस्थांमध्ये अमेरिकन मराठी मिशनचे महाराष्ट्रातील कार्य उल्लेखनीय आहे. 'अमेरिकन बोर्ड' या मिशनरी सोसायटीमार्फत ही संस्था चालविली जात होती. अहमदनगर हे या मिशनचे प्रमुख केंद्र होते. गॉर्डन हॉल याच्या नेतृत्वाखाली सन १८१३ मध्ये या मिशनची पहिली तुकडी महाराष्ट्रात आली. त्यांनी ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करण्याकडे विशेष लक्ष दिले. वेगवेगळ्या खेड्यांत जाऊन तेथील अडीअडचणी पाहून तेथील समाजासाठी शाळा, दवाखाने, पिण्याच्या पाण्याची सोय इत्यादी सोई निर्माण करणे; भाषणे, विविध गोष्टी, चित्रे या माध्यमांद्वारे लोकांना ख्रिश्चन धर्माची माहिती करून देणे ही कामे मिशनऱ्यांनी मोठ्या प्रमाणात केली. मुद्रणकलेच्या ज्ञानाचा उपयोग करून ख्रिश्चन धर्मातील वचने, बायबलमधील गोष्टी, हिंदू धर्मातील अनिष्ट परंपरा आणि ख्रिश्चन धर्मातील चांगली तत्त्वे व आचार यांची माहितीपत्रके वाटून लोकजागृती केली. त्यामुळे अहमदनगर विभागातील अस्पृश्य जातीतील मुले व मुली शिक्षणाकडे आकृष्ट झाल्या. या मिशनच्या कार्यात फेअरबँक, ज्युलिया बिसेस, डॉ. बेलेंटाईन इत्यादी मिशनऱ्यांनी फार परिश्रमपूर्वक कार्य केले. त्यामुळेच या विभागात अनेक शाळा, ८ प्रचार केंद्रे, ७६ उपकेंद्रे, अहमदनगर येथे महाविद्यालय, अनेक दवाखाने सुरू केले. शाळांतून मिळणारे शिक्षण, समानतेची वागणूक, दवाखान्यातून मिळणारी मोफत औषधे, मिशनऱ्यांकडून मिळणारी सन्माननीय व आत्मीयतेची वागणूक यामुळे कनिष्ठ जातीतील अनेक जण ख्रिश्चन धर्माकडे आकृष्ट झाले. अनेकांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला. १८५७ पर्यंतचा कालखंड महाराष्ट्राच्या इतिहासाच्या दृष्टीने पाहिल्यास ख्रिश्चन धर्मप्रसारकांच्या कर्तबगारीचा व काही प्रमाणात यशाचा कालखंड मानला जातो. १८५७ नंतर ब्रिटिश सरकारने शिक्षणाच्या बाबतीत धर्मनिरपेक्ष धोरणाचा स्वीकार केला. त्यामुळे शिक्षणक्षेत्रातील मिशनऱ्यांचा प्रभाव कमी झाला.

महाराष्ट्रात शिक्षणाच्या क्षेत्रात वेगवेगळ्या मिशननी अतिशय महत्त्वाचे कार्य केले. तथापि, त्यांच्या कार्यामागे धर्मप्रचार हा एकमेव महत्त्वाचा हेतू होता. महाराष्ट्रात त्यांनी केलेला शिक्षणप्रसार, स्त्रियांना शिक्षण घेण्याची उपलब्ध करून दिलेली संधी, समतेची वागणूक या बाबी महाराष्ट्रातील समाजजागृतीला उपयुक्त ठरल्या. सुशिक्षित लोक समाजातील वेगवेगळ्या समस्यांवर विचार करू लागले. आपल्या अवस्थेविषयी, धर्माच्या स्वरूपाविषयी व पारतंत्र्याविषयी आत्मपरीक्षण करण्यास सुरुवात केली. ही जागृतीच समाजसुधारणेला आणि स्वातंत्र्य चळवळीला अत्यंत पोषक ठरली.

**ख्रिश्चन मिशनऱ्यांचे वृत्तपत्रीय व वाङ्मयीन कार्य :** भारतात वेगवेगळ्या भाषांचा वापर केला जातो. कोणत्याही समाजात धर्मप्रचार करताना कोणत्याही परकीय भाषेपेक्षा लोकभाषेतून धर्मप्रचार केला, ख्रिश्चन धर्मग्रंथाचे अनुवाद लोकभाषेतून छापून समाजात वाटले तर लोकांवर त्याचा जास्त प्रभाव पडतो याची मिशनऱ्यांना जाणीव होती. मुद्रणकलेचे ज्ञान

धर्मप्रचारकांना होते. त्यांनी भारतातील भाषांचा अभ्यास केला. त्या भाषेतील टाईप तयार करून बायबलचे त्या त्या भाषेत भाषांतर करून छापले, कोलकत्याजवळील श्रीरामपूर येथील डॉ. कॅरे यांनी याबाबत फार मोठे परिश्रम घेतले.

इतर भारतीय भाषांप्रमाणेच मराठी भाषेचाही या धर्मप्रचारकांनी अभ्यास केला. त्यांनी देवगिरी लिपीचे टाईप तयार करून कार्य सुरू केले. 'ज्ञानोदय', 'तारप्रसारक', 'प्रभोदय', ' सायंदीपिका' ही त्यापैकी प्रमुख वृत्तपत्रे होती. सन १८४२ मध्ये अमेरिकन मिशनमार्फत 'ज्ञानोदय' हे पाक्षिक मराठी व इंग्रजी भाषेतून सुरू केले. ख्रिश्चन धर्माविषयीची माहिती, त्यातील आदर्श तत्त्वांचे विवेचन, हिंदू धर्मातील अनिष्ट सामाजिक व धार्मिक परंपरांची निंदा, विविध देवता व त्यांच्या आचारावर टीका इत्यादी मजकूर यातून प्रकाशित केला जात होता. समाजात धर्मप्रचार करण्यासाठी या वृत्तपत्रांचा त्यांना मोठ्या प्रमाणात उपयोग झाला.

या शतकातील मराठी वाङ्मयाच्या निर्मितीला ख्रिश्चन मिशनऱ्यांनी मोठे योगदान दिले. मराठी भाषेतील प्रारंभीच्या काळातील पद्य वाङ्मय हे या ख्रिश्चन धर्मप्रचारकांच्या धार्मिक चळवळीतूनच निर्माण केले. स्थानिक समाजाची भाषा आत्मसात करून त्या भाषेतून प्रवचने देण्यास या मिशनऱ्यांनी सुरुवात केली, त्याचप्रमाणे ग्रंथनिर्मितीच्या कार्यालाही त्यांनी चालना दिली. भारतीय समाजात आपल्या ख्रिश्चन धर्मग्रंथाचा प्रचार व्हावा, त्याचे महत्त्व लोकांना पटावे म्हणून सन १८१७ मध्ये अमेरिकन मिशनच्या धर्मप्रचारकांनी देवनागरी टाईप वापरून बायबलच्या काही भागांचे मराठीत भाषांतर केले. या ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या प्रयत्नामुळेच इंग्रजी-मराठी शब्दकोश, मराठी भाषेचे व्याकरण यांसारखी पुस्तके प्रकाशित झाली. १८०५ मध्ये डॉ. कॅरे यांनी मराठी भाषेचे व्याकरण प्रकाशित केले. त्यांनीच १८१० मध्ये मराठी-इंग्रजी कोश तयार केला. ख्रिश्चन धर्माच्या प्रसारासाठी अमेरिकन मराठी मिशन व स्कॉटिश मिशन यांनी वाङ्मय व वृत्तपत्रेनिर्मितीच्या क्षेत्रात केलेले कार्य महत्त्वपूर्ण आहे. या वाङ्मय निर्माण करण्यामुळे मराठी वाङ्मयनिर्मितीला चालना मिळाली. समाजात वाङ्मयाचा प्रसार करून, विविध विषयांचे समाजाला ज्ञान देणे व त्यावर चिंतन करण्याची प्रवृत्ती निर्माण करण्याचे श्रेय ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या या वाङ्मयीन व वृत्तपत्रीय कार्यालाच द्यावे लागेल.

आधुनिक महाराष्ट्रातील समाजसुधारणेच्या इतिहासाच्या संदर्भात विचार केल्यास ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या शैक्षणिक व वाङ्मयीन कार्याला महत्त्व द्यावे लागेल. अनेक शाळांची निर्मिती करून त्यांनी समाजातील सर्व वर्गांना, प्राधान्याने कनिष्ठ जाती व स्त्रियांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. या पाश्चिमात्य शिक्षणामुळे परदेशातील प्रगत भौतिकशास्त्रे आणि राजकीय, सामाजिक व आर्थिक विचारांचे समाजाला ज्ञान झाले. सती, बालविवाह, विधवा केशवपन यांसारख्या सामाजिक पद्धती मानवतेच्या दृष्टीने पाहिल्यास किती भयंकर स्वरूपाच्या आहेत हे समाजाला जाणवले. या जाणिवेतूनच काही जणांनी समतेला प्राधान्य देणाऱ्या ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला. तर काही जणांनी मात्र आपल्या समाजातील अनिष्ट व भयानक पद्धती दूर करण्यासाठी सामाजिक जागृतीचे कार्य सुरू केले. त्याचबरोबर भारतातील परंपरागत शिक्षणापेक्षा पाश्चिमात्य ज्ञान आत्मसात करणे गरजेचे आहे असे समाजासमोर

मांडण्यास त्यांनी सुरुवात केली. त्यातूनच महाराष्ट्रात समाजसुधारकांची एक पिढीच निर्माण झाली. या समाजसुधारकांनी केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर भारतीय समाजाच्या जीवनात भावी काळात परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. मिशनऱ्यांनी मुद्रणकलेची सुरुवात केली. देवनागरी भाषेचे टाईप तयार केले. वृत्तपत्रे सुरू झाली. मराठी भाषेत ग्रंथनिर्मिती होऊ लागली. समाजसुधारणेसाठी उपयुक्त असलेल्या घटकांचे ज्ञान भारतीयांना झाले. वृत्तपत्रांचा लोकशिक्षण व प्रबोधनासाठी उपयोग झाला. मराठी वाङ्मयाला चालना मिळाली. भारतीय समाज हा परंपरावादी असल्यामुळे मिशनऱ्यांना धर्मप्रचारात इतर देशांत जेवढे यश मिळाले; तेवढे भारतात मिळाले नाही. मिशनऱ्यांनी हिंदू धर्मावर केलेल्या टीकेमुळे हिंदू धर्माचे खरे स्वरूप समाजासमोर मांडण्याची आवश्यकता भासू लागली. यातून धर्मसुधारणेची चळवळ सुरू झाली. हिंदू धर्मातील रूढी, परंपरांचे जे शिक्षण सुरू झाले त्याचे श्रेय ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या कार्यालाच द्यावे लागेल.

१९ व्या शतकातील ब्रिटिश सत्तेच्या या प्रारंभीच्या स्वरूपाकडे पाहिल्यास भारतात व महाराष्ट्रात आपली राजकीय सत्ता स्थिर करण्याच्या दृष्टीने त्यांनी प्रयत्न केले व त्यासाठी उपयुक्त असलेल्याच सुधारणा केल्या असे दिसते. भारतात आपली एकछत्री सत्ता त्यांनी स्थापन केली. प्रशासकीय विभागाद्वारे या सत्तेची पकड घट्ट केली. अंतर्गत शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करून येथील समाजाचा विश्वास संपादन केला. शस्त्रास्त्रे बाळगण्याविषयी बंधने घालून भारतीयांचे निःशस्त्रीकरण करण्याचा प्रयत्न केला. अर्थव्यवस्थेत सुधारणा केली व साम्राज्यातून येणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाण निश्चित केले. सर्वेक्षण, गॅझेटियर व जनगणना यांच्याद्वारे भारतीय समाजाच्या सर्वांगीण जीवनाची सविस्तर माहिती संकलित केली. कायद्याचे संहितीकरण करून न्यायालयीन कामकाजात सुसूत्रता आणली. इंग्रजी माध्यमातून पाश्चिमात्य शिक्षण देण्यास सुरुवात केली. त्याद्वारे ब्रिटिशांच्या प्रगतीची व श्रेष्ठत्वाची भारतीयांना जाणीव व्हावी व आपल्या परंपरागत ज्ञानाचे कनिष्ठत्व त्यांच्या मनावर ठसावे हा प्रयत्न करण्यात आला. प्रारंभीच्या काळात या त्यांच्या प्रयत्नांना यशही आले. प्रशासकीय यंत्रणेतील आवश्यक असणारा कारकुनी वर्ग सहजपणे उपलब्ध व्हावा ही या शैक्षणिक प्रगतीमधील त्यांची भूमिका होती. स्वातंत्र्यप्रेरणेची वाढ होऊ नये म्हणून त्यांनी मुद्रणस्वातंत्र्यावर अनेक बंधने लादली. दळणवळण व वाहतूक यंत्रणेत सुधारणा करून त्यांनी आपल्या व्यापारात वाढ केली. भारतीयांचे व्यापार व उद्योगधंदे बंद पाडले. ब्रिटिशांनी आपली राजकीय सत्ता येथे स्थिर व्हावी म्हणून वरील उपाययोजना केली असली, भारतीयांची या काळात प्रचंड प्रमाणावर लूट केली असली, तरी त्यांच्या या धोरणाचे, सुधारणेचे काही चांगले फायदेही झाले.

भारतीय समाजाला दीर्घकालानंतर शांतता व सुव्यवस्थेचे, न्यायालयीन समानतेचे जीवन जगावयास मिळू लागले. शिक्षणाच्या प्रगतीमुळे त्यांना भौतिक विद्या व पाश्चिमात्यांचे स्वातंत्र्य, समानता व मानवता यांविषयीचे प्रगत ज्ञान आत्मसात करण्याची संधी मिळाली, या ज्ञानाच्या आधारे आत्मपरीक्षण करणाऱ्या समाजधुरिणांना भारतीय समाजाच्या सामाजिक,

Scanned with ACE Scanner

धार्मिक व आर्थिक जीवनात बदल घडवून आणण्याची गरज वाटू लागली. वृत्तपत्रे, नियतकालिके, सभा–संमेलने, व्याख्याने इत्यादींच्या माध्यमातून त्यांनी हा प्रगत विचार समाजासमोर मांडला. समानतेचे महत्त्व पटविण्याचा व जातिसंस्थेचे दुष्परिणाम दाखविण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्याचे महत्त्व समाजाला जाणवू लागले. आपल्या पारतंत्र्याची मीमांसा त्यांनी सुरू केली व हे पारतंत्र्य दूर करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनेवर चिंतन करून त्या दृष्टीने हालचाल करण्यास सुरुवात केली. अखिल भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना व २० व्या शतकातील स्वातंत्र्य चळवळ हे १९ व्या शतकातील ब्रिटिशांच्या सत्तेच्या स्वरूपाचेच फळ होय असे मानता येते. ब्रिटिशांच्या या कार्याने भारतीय इतिहासाला पुढील कलाटणी दिली असे दिसते.